। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ९५ वा । गुरूवार दिनांक १८ जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर व कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

धाराशिव,दि.१६ जून (जिमाका) जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद,जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा शासकीय रुग्णालय,धाराशिव तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जून रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर,कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम आणि सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले.हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती.अभिश्री देव यांच्या मार्गदर्शक नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक व माजी शिक्षक श्री.राजेंद्र गोपाळराव अत्रे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे हक्क,अधिकार तसेच त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सुविधांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

जिल्हा वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहाण यांनी रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सोयी -सुविधांची माहिती दिली.ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रशासन सदैव प्रयत्नशील राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.तसेच डॉ.धनंजय चाकुरकर यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यात येईल,असे सांगत विविध विशेष योजनांची माहिती दिली.

अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिन पांडकर यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे पोलीस प्रशासनामार्फत तातडीने निवारण करण्यात येईल, अशी ग्वाही उपस्थितांना दिली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती.भाग्यश्री पाटील यांनी ज्येष्ठ नागरिक व महिलांना मोफत कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्राधिकरण सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले.तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या विविध योजनांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्रीमती.पाटील यांनी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. भविष्यातही जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत अशा प्रकारचे कायदेविषयक जनजागृतीपर उपक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येतील,असेही त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या डिजिटल युगात ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक होऊ नये यासाठी कार्यक्रमात विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.सायबर गुन्हे आणि आर्थिक सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मोठ्या पडद्यावर माहितीपट दाखविण्यात आले. सायबर पोलीस स्टेशन,धाराशिवचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.कासुळे यांनी सायबर फसवणुकीपासून बचाव करण्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यविषयक तक्रारींची तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन धाराशिव ज्येष्ठ नागरिक संस्थेचे सचिव श्री.अनिल पाटील यांनी केले,तर सूत्रसंचालन ड.गौरी ठोंबरे यांनी केले.कार्यक्रमास शहरातील माजी सैनिक,मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.तसेच आरोग्य विभाग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## क्राईम न्युज

### जिल्ह्यात मोटारसायकलची चोरी : गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बाबासाहेब चंद्रकांत पाटुळे, वय ३६वर्षे, रा. आरसोली ता. भुम जि. धाराशिव यांची २८,००० किंमतीची मोटरसायकल दि. १०.०१.२०२६ रोजी २२.०० श्री एस कडमी समोर सुळ डॉक्टर यांचे दवाखान्याजवळुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बाबासाहेब पाटुळे यांनी दि.१५.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत नामे-मलीक ईलाही कुरेशी, वय २७ वर्षे, रा. काटी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची ३०,००० किंमतीची स्प्लेंडर मोटरसायकल ही दि. १२.०६.२०२६ रोजी फिर्यादीचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मलीक कुरेशी यांनी दि.१५.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

कळंब पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अमर सतिश मडके, वय ३३ वर्षे, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव यांची ४०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. २०.०५.२०२६ रोजी मोहा शिवार शेत गट नं ३७७ मध्ये घराचे समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमर मडके यांनी दि.१५.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉड व काठीने मारहाण

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ज्ञानेश्वर, रामा , श्रीरंग सर्व रा. वांगी बु. ता. भुम जि. धाराशिव यांनी दि १४.०६.२०२६ रोजी माणकेश्वर फाटा फिर्यादी नामे -मालन ज्ञानबा अंधारे, वय ६२ वर्षे, रा. वांगी बु. ता. भुम जि. धाराशिव यांना नमुद व्यक्तींनी अश्लील शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉड व काठीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मालन अंधारे यांनी दि.१६.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे भा.न्या. सं.कलम ११८(२),११८(१), ११७(२), ७४, ७६, ७९, २९६, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सिध्देश्वर वडगाव येथील मंदीरपरिसरातून मोटारसायकलची चोरी

धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत - चांदपिर यासीन मुलानी, रा. मेसगाव ता. माढा जि. सोलापुर यांची २५,००० किंमतीची मोटरसायकल सिध्देश्वर वडगाव येथील मंदीराच्या परीसरातुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. मुलानी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळेत ‘शाळा प्रवेश उत्सव’; ५० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, गुलाब व मिठाईचे वाटप




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळा, धाराशिव येथे शाळा प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने रोटरी क्लब धाराशिवच्या वतीने पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या ५० विद्यार्थ्यांचे स्कूल बॅग, गुलाबाचे फूल आणि मिठाई देऊन आनंदोत्सवात स्वागत करण्यात आले.

महाराष्ट्रात १५ जून हा नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ मानला जातो. या दिवशी पहिल्यांदाच शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान पाहण्यासारखे होते. शाळेचा परिसर आकर्षक रांगोळ्या, फुलांच्या सजावटी व स्वागत फलकांनी सजविण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे गुलाबी फेटे बांधून, टिळा लावून व फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले.

यावेळी मुलांची शाळेबद्दलची भीती दूर व्हावी, शाळेबद्दल आत्मीयता निर्माण व्हावी यासाठी शिक्षकांनी मुलांशी संवाद साधत विविध खेळ व उपक्रम आयोजित केले. काही विद्यार्थ्यांचे पाटीपूजन व सरस्वती पूजन करून शुभारंभ करण्यात आला. तसेच पहिलीतील विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन ते शाळेच्या भिंतीवर स्मृतीस्वरूप जतन करण्यात आले.

याच कार्यक्रमात प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळेत स्थापन करण्यात आलेल्या इंटरॅक्ट क्लबच्या अध्यक्ष व सचिव यांना इंटरॅक्ट क्लबचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

रोटरी क्लब धाराशिवच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबाचे फूल व मिठाई देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमधील शाळेची भीती दूर करणे, शिक्षणाबद्दल गोडी निर्माण करणे, शाळा म्हणजे आनंद आणि शिकण्याचे मंदिर हा संदेश देणे तसेच पालक व शाळा यांच्यात विश्वासाचे नाते अधिक दृढ करणे हा होता.

यावेळी रोटरी क्लब धाराशिवचे अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सगरे सर, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक तसेच रोटरी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम आनंद, उत्साह आणि विद्यार्थ्यांच्या हास्याने भारावलेल्या वातावरणात पार पडला.

# धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अंकुश वय ४५ वर्षे, रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी ०८.४० वा. सु. भुम आठवडी बाजार कट्याचे मोकळ्या जागेत अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.तर दशरथ , वय २४ वर्षे, रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी ०९.१५ वा. सु. कल्याण नगर भुम येथे अंदाजे १,००० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.तर सुगंधा वय ४५ वर्षे, रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.१६.०६.२०२६ रोजी १०.१० वा. सु. भुम आठवडी बाजार तळाच्या जवळ अंदाजे ५०० किंमतीची ०५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर संतोष वय २९ वर्षे, रा. सोनगिरी ता. भुम जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी सोनगिरी येथे चौकात मोकळ्या जागेत अंदाजे १,९२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २४ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र ४ गुन्हे नोंदविले आहेत.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत साहिल वय २९ वर्षे, रा. येडशी ता. जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी १३.०० वा. सु. येडशी सोनेगाव जाणारे रोडलगत असलेल्या आर्यन पान शॉप समोर अंदाजे ६०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर शिवाजी वय २५ वर्षे, रा. येडशी ता. जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी राहते घराचे पत्र्याचे शेड समोर येडशी येथे अंदाजे १,८०० किंमतीची १७ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.तर दत्तात्रय वय ४७ वर्षे, रा. येडशी ता. जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी १५.२० वा. सु. राहते घराचे पत्र्याचे शेड समोर येडशी येथे अंदाजे ३,६०० किंमतीची ३४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# लोहाऱ्यात जुगार अड्ड्यांवर पोलिसांचा धडक छापा; १२ जण ताब्यात, ९.३८ लाखांचा मुद्देमाल जप्त



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- धाराशिव जिल्ह्यात अवैध व्यवसायांविरोधात पोलीस प्रशासनाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले असून, लोहारा परिसरातील जुगार अड्ड्यांवर टाकलेल्या धडक छाप्यात १२ संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत तब्बल ९ लाख ३८ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक रीतु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली ही प्रभावी कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे लोहारा येथील काणेगाव रोड तसेच माकणी चौक परिसरातील एका हार्डवेअर येथे सुरू असलेल्या तीन पत्ती (तिरट) जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी एकाच वेळी छापेमारी केली. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण सोमवंशी, सुरेश कासुळे, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र बहुरे तसेच QRT पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

छाप्यात १३ संशयित निष्पन्न झाले असून, त्यापैकी १२ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. एका संशयिताचा शोध सुरू असून, सर्वांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ अंतर्गत लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कारवाईदरम्यान जुगाराचे साहित्य, मोबाईल फोन, एक चारचाकी वाहन, सहा दुचाकी वाहने आणि अन्य साहित्य असा एकूण ९.३८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यात अवैध जुगार, मटका, हातभट्टी दारू, अवैध मद्यविक्री, अमली पदार्थांची तस्करी व इतर बेकायदेशीर व्यवसायांविरोधात पोलीस प्रशासनाने उघडलेली मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या धडक कारवायांमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, कायद्याचा धाक अधिक मजबूत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# परंड्यात नशेच्या गोळ्यांच्या अवैध व्यापारावर ANTF चा घाला; ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- परंडा शहरात सुरू असलेल्या नशेच्या गोळ्यांच्या अवैध विक्रीला अहमदनगर अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ने जोरदार दणका दिला आहे. गुप्त माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या कारवाईत एका संशयितास ताब्यात घेऊन त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या गोळ्या आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आला. ANTF पथकाला मिळालेल्या माहितीनुसार शासकीय रुग्णालय परिसरात सापळा रचण्यात आला. पंच व अन्न-औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या तपासणीत संशयिताकडे Nitrozepam आणि Alprazolam घटक असलेल्या गोळ्यांचा साठा आढळून आला. या गोळ्यांची बेकायदेशीर विक्री करण्याच्या उद्देशाने त्या जवळ बाळगण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. या कारवाईत एकूण ५७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये विविध प्रकारच्या नशेच्या गोळ्या तसेच विक्रीसाठी वापरला जाणारा मोबाईल फोन यांचा समावेश आहे. जप्त मुद्देमालासह आरोपीला परंडा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून त्याच्याविरुद्ध NDPS कायदा व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक गीता वाघवारे व ANTF पथकाने केलेल्या या कारवाईमुळे नशेच्या अवैध व्यवसायात गुंतलेल्या घटकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### रोडवर रस्ता ओलांडत असता धडकेत गंभीर जखमी होवून मृत्यू

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे-ताजोद्दीन उस्मानसाहेब शेख, वय ८१ वर्षे, रा. वाघोली गौर ता. कळंब जि.धाराशिव हे दि.१३.०५.२०२६ रोजी मस्सा खं बसस्थानक रोडवर रस्ता ओलांडत होते. दरम्यान मारुती सुझुकी सुपर कॅरी चारचाकी चा चालकाने त्याचे ताब्यातील कार ही हायगईने व निष्काळजीपणे चालवून ताजोद्दीन शेख यांना धडक दिली. या अपघातात ताजोद्दीन शेख हे गंभीर जखमी होवून मयत झाले.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- नसरुद्दीन ताजोद्दीन शेख, वय ४२ वर्षे, रा. वाघोली गौर ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१६.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१), १२५(अ)(ब) २८१, सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## पावसाळा लांबल्याने चिंतेत भर

अमेरिका - इराण यांच्यात युद्ध सुरू होताच महागाई वाढली. त्यात राज्यात मान्सून लांबला आहे. सात जूनला मृगनक्षत्रामुळे जनता आनंदी होती मात्र निराशा झाली. कधी असा मृगनक्षत्राने धोका दिला नाही मात्र यावर्षी दगा दिला आहे. दरवर्षी मृगनक्षत्रावर पेरण्या होतात मात्र यावर्षी झाल्या नाहीत. पाऊस पडला नाही. शेतकऱ्याच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत. पाऊस कधी पडेल व पेरण्याकधी करू अशी आतुरता निर्माण झाली आहे. यावर्षी शेतकऱ्यावर संकट आले असले तरी पाऊस पडेल असा दिलासा दिला जात आहे. हवामान सांगणारे वरचेवर तारखा देत आहेत. तारीख पे तारीख केवळ कोर्टात होती आता हवामानाचा अंदाज सांगणारे तारखा सांगत आहेत. तशी ही दिशाभुल म्हणावी लागेल. मुळात पक्के ज्ञान नाही तरी अंदाज सांगतात. वास्तविक त्यांना अंदाज सांगा असे निमंत्रण नाही. इतर परदेशात मात्र अंदाज नाही तर पक्की माहिती दिली जाते. हवामानच काय भुगर्भातील हालचाली सांगतात. त्यामुळे धोका होत नाही. सध्याला काय होते तर भाकित सांगणारे भरपूर झाले आहेत, त्यांना सुद्धा आपण काय सांगत आहोत हे कळत नाही. असो मृगनक्षत्र निघून दहा दिवस होतात तरी पावसाचा पत्ता नाही. संबंध राज्यात सरी येत नाहीत, पडला तेथे पावुस पडत आहे. राज्यात एक टक्का पेरण्या झाल्या आहेत. जवळपास पेरण्या नाहीत, दुष्काळजन्य स्थिती निर्माण होते की, काय असे वाटत आहे. पाऊस चांगला झाला, वेळेवर पेरण्या झाल्या तरच सुख व समाधान दिसून येते. पेरण्या लांबल्यातर चोऱ्या व लुटीचे प्रकार होतात. चिंताजनक स्थिती निर्माण होते. त्यामुळे पाऊस वेळेवर पडणे व पेरण्याहोणे हे आवश्यक आहे. एक तर निसर्ग लहरी बनला आहे. देशातील बहुतांशी शेती ही निसर्गावर आवलंबुन आहे. दिवसेंन दिवस पावसाळा कमी होत आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर गेली आहे. नागरिकांनी जमीन चाळणीसारखी केली आहे. किती खोलीवर विंधन विहिरी घ्याव्यात याला बंधन नाही. एकतर पाण्याची पातळी खोलवर केल्याने कितीही फुट खोल विंधन विहीरी घेतल्या जात आहे. अक्षरशा जमीनीची चाळणी केली आहे. हे योग्य नाही. पावुसकाळ वाढवा यावर उपाय नाही. कितीही झाडे तोडली तरी शिक्षा नाही. होत नाही. अन्नधान्याचे संकट आले तरी मात करता येवू शकेल, मात्र पाणी संकटावर शक्य नाही. पाणी तयार करण्याची प्रक्रिया केवळ इश्वराकडे आहे. पावुस पाडणे ही इश्वराची देन आहे. ईश्वररूपी निसर्गाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात केला जात आहे. राज्याला युद्धामुळे व पेरण्या लांबविल्याने दुहेरी संकट निर्माण झाले आहे. बाजारपेठा ग्राहक नसल्याने थंड आहे. शेतकऱ्यांनी शेतात मशागत करून पेरणीसाठी राणं तयार केली आहेत. केवळ पावुस नसल्याने चिंतेत भर पडली आहे. वास्तविक संकट येणार हे कोणी सांगितले नाही. वेळेवर शंभरटक्के पावुसमान होईल असेच भाकित केले होते. वास्तविक भविष्य सांगणारे, हवामानाचा अंदाज सांगणारे हे काही विज्ञानाला धरून सांगतात की, आपल्याच मनाचे सांगतात हे कळून येत नाही. भविष्य तर लबाड असते कारण नोटाबंदी होणार हे कोणत्याही भविष्यवर्तविले नाही. युद्धाची झळ बसणार हे सांगितले नाही. वास्तविक चिट व पट हे दोन्ही ही माझेच आहेत असे सांगणारी मंडळी आहे. त्यामुळे राज्यातील जनतेनी भाकित सांगण्यावर विश्वास ठेवू नये. त्यांचे भले करता आले नाही ते दुसऱ्याचे काय करणार? विज्ञानाची साथ घ्या. पावुस का पडत नाही. सालमान कठिण का जात जात आहे. पुर्वीपेक्षा पाऊस का कमी झाला आहे. या बाबत विचार करा. पुर्वी आजोबा-पंजाबांनी लावलेली झाडे तोडून विकून खाल्ली, सावलीसाठी झाडे नाहीत. जनावरे पाळणे सोडून दिले. सर्व काही निसर्गाच्या विरोधात वागत असल्याचा हा परिणाम आहे. पावुस कमी का पडतो? यामागील कारणाचा शोध घेतला पाहिजे. गावात सरपंच, पोलिसपाटी, ग्रामसेवक, तलाठी असतात त्यांच्या समक्ष साक्षीने वृक्षतोड होते असेल तर दुसऱ्याना नावे ठेवून काहीच उपयोग नाही? सरकारतरी काय करणार, दुष्काळ पडला खा सुकडी, परदेशातून ईलो-मीलो मागवुन खाण्यासाठी दिलेच आहे हे अनेकांना माहिती आहे. या महिणाअखेर पेरण्या झाल्या नाहीत, पाऊस पडला नाही तर मोठे संकट आल्याशिवाय राहाणार नाही. वास्तविक आपल्यादेशात शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. घराघरात शिकलेली मंडळी आहे असे असताना झाडे लावा! झाडे लावा! असे वारंवार सांगावे लागते. सरकारसुद्धा या बाबत ऑडीट करती नाहीत. 'आंधळ दळत आहे तर कुत्रे पीठ खात' आहे अशी स्थिती वृक्षारोपनाची झाली आहे. त्यामुळे निसर्गाचा ऱ्हास होत आहे. वातावरणातील दुषीतपणा वाढला आहे. दुषीतपनामुळे अशुद्धता निर्माण होत आहे. वातावरणावर याचा मोठा परिणाम होत आहे. शुद्ध ऑक्सीजन मिळत नाही. वड, पिंपळ ऑक्सीजन देणारे वृक्ष आहेत. ती किती नागरिकांनी जीवंत ठेवली. पाऊस वेळवर न पडण्यामागे मानवाचा हात आहे हे प्रथम लक्षात घ्यावे. सरकारसुद्धा या बाबत झोपेत आहे असे दु:खाने म्हणावे लागते. दुष्काळजन्य स्थिती निर्माण होत असताना आज पर्यंत कोणते मार्गदर्शन केले आहे? संकट येणार हे पहिल्यांदा सरकारला कळते. त्यांच्याकडे यंत्रणा असते. तरी उपायोजना केली जात नाही. राज्यातील शेतकरीसह नागरिक दुहेरी संकटात सापडला आहे. युद्धामुळे इंधनाच्या दरात वाढ झाली आहे. दुसरे पेरण्या लांबल्याने मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. पावुस कधी पडेल हे कोणी पक्के सांगण्यासाठी तयार नाही. त्यामुळे एक प्रकारे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वरचेवर पाणी साठ्यात घट होत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. आणखिन थोडे दिवस पावुस पडला नाही तर चिंतेत वाढ होणार आहे. विज्ञानाची साथ घेतली जात नाही. अंदाजाने धोका बसू शकतो. त्यामुळे आता शेतकऱ्याने कोणता निर्णय घ्यायचा यावर चिंतन करावे. मोठ्या प्रमाणता जो पर्यंत झाडे लावुन ती जगविणार नाहीत तो पर्यंत निसर्ग साथ देणार नाही. वरचेवर वाईट परिस्थितीला तोंड द्यावे लागेल हे लक्षात ठेवावे.

# अल निनो संकटाचा सामना; शेतकऱ्यांची सतर्कता आवश्यक




'अल निनो' हा शब्द महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे.अल निनो हे एक वातावरणीय संकट असून आता या संकटाच्या आम्ही जवळ असून याचा सर्वाधिक परिणाम जून मध्ये मृग आणि रोहिणी नक्षत्रावर झाला आहे. तो पुढेही होऊ शकतो. त्यामुळे या लेखात, चला ! अल निनो या वातावरणातील बदलाच्या संकटाला सोप्या भाषेत समजून घेऊया ! राज्यातील शेतकऱ्यांनी हे बदल समजून घेऊन हवामान व कृषी खात्याच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांनी देखील या संदर्भात पुढील काळाचे नियोजन करणे आवश्यक आहे. चला ! सोप्या भाषेत हा विषय समजून घेऊया

हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांमध्ये अल निनो ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना विशेष महत्त्वाची मानली जाते. जागतिक हवामान संघटना (थचज), भारत हवामान विभाग (खचऊ), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (ऋ-ज) आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार अल निनोचा प्रभाव केवळ हवामानापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम शेती, जलसंपदा, पशुधन, आरोग्य, जैवविविधता आणि अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या घटनेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यासाठी पूर्वतयारी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**अल निनो म्हणजे काय?**

अल निनो हा स्पॅनिश शब्द असून त्याचा अर्थ लहान मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अल निनो स्थिती निर्माण होते. ही घटना एछडज (एश्र छळ०ो डेीींहशीप जीलळश्रश्रर्रींळेप) या जागतिक हवामान प्रणालीचा भाग आहे.

आता हे कसे होते हे जाणून घेऊया ! समुद्रातील तापमानातील या बदलांमुळे जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. त्यामुळे काही भागात दुष्काळ, तर काही भागात अतिवृष्टीसारख्या घटना घडू शकतात.

**अल निनो दरवर्षी येतो का?**

नाही. जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार अल निनो साधारणतः दर दोन ते सात वर्षांनी उद्भवतो. त्याचा कालावधी साधारण नऊ महिने ते एक वर्ष किंवा काही वेळा त्याहून अधिक असू शकतो. प्रत्येक अल निनोची तीव्रता आणि परिणाम सारखेच असतील असे नाही.

**भारतावर यापूर्वी काय परिणाम झाला?**

भारतातील शेतकरी, पर्यावरण तज्ञ, जलतज्ञ, वनतज्ञ, कृषी तज्ञांसाठी अल निनो हा शब्द आता अपरिचित राहिलेला नाही. भारतातील मान्सून आणि अल निनो यांचा संबंध अनेक दशकांपासून अभ्यासला जात आहे. १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये भारताने कमी पावसाचा अनुभव घेतला होता. विशेषतः २००२ आणि २००९ मध्ये देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गेल्या वर्षी जसा तुफान पाऊस झाला किंवा त्या वर्षापूर्वीही जसा पूरक पाऊस झाला तसा पाऊस यावर्षी नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

तथापि, हवामान तज्ञ स्पष्ट करतात की प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. भारतीय महासागरातील तापमान, अरबी समुद्रातील स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे आणि इतर हवामान घटकही मान्सूनवर प्रभाव टाकतात.

**हवामान तज्ञांचे काय मत आहे?**

जागतिक हवामान संघटना (WMO), भारत हवामान विभाग (IMD), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FAO) आणि इतर संशोधन संस्थांच्या मते अल निनो हा जागतिक हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक भाग आहे. मात्र जागतिक तापमानवाढीमुळे त्याचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हवामान तज्ञांच्या मते, अल निनोमुळे जागतिक सरासरी तापमान वाढू शकते. उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढू शकते. काही भागात दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत पेरणीच्या नियोजनासाठी हवामान अंदाजांचे महत्त्व अधिक वाढते.

**'अल निनो 'परिणाम रोखण्यासाठी प्रयत्न**

अल निनो ही नैसर्गिक महासागरीय घटना आहे, त्यामुळे यावर्षी अनेक बाबतीत अनियमितता घडू शकते. अशा परिस्थितीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साधारणत: अशावेळी शासन स्तरावर हवामानाचा सतत अभ्यास आणि पूर्वसूचना प्रणाली विकसित व कार्यक्षम केली जाते, जलसंधारण प्रकल्प राखीव ठेवले जातात. पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे सुचविले जाते. दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तयार केले जातात, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते, हवामान आधारित कृषी सल्ला सेवा दिली जाते, बियाणे व चारा उपलब्धतेचे नियोजन करणे, जलाशय व्यवस्थापन आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या काळात शासनामार्फत केले जाते.

**शेतकऱ्यांनी काय करावे**

शासन स्तरावर हे सर्व निर्णय घेतले जात असताना आपल्या शेतकऱ्यांनी या परिस्थितीत काय करावे यासंदर्भात कृषी तज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. कृषी तज्ञांच्या मते अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

१. हवामान अंदाजांवर लक्ष ठेवावे:

भारत हवामान विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

२. पीक निवडीचे नियोजन करावे:

कमी कालावधीत येणारी आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके निवडण्याचा विचार करावा.

३. जलसंधारणाला प्राधान्य द्यावे:

शेततळे, बांधबंदिस्ती, पावसाचे पाणी साठवणे, चर निर्माण करणे, शेत व शेत रस्त्याच्या मध्ये पाणी साठवणे, ओलसरपणा राहिली, मूलस्थानी जलसंधारणासाठी प्रयत्न करणे.

४. उपलब्ध जलस्तोत्रातून फक्त सूक्ष्म, ठिबक आणि तुषार सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

५. पीक विमा घ्यावा:

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी हे सर्वात आवश्यक आहे.

६. पशुधन व्यवस्थापन:

चारा आणि पाण्याची उपलब्धता याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे.

७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी विभागाने सांगितल्याशिवाय पेरणी न करणे कारण या परिस्थितीत दुबार, तिबार पेरणीची शक्यता असते.

**सामान्य नागरिकांनी काय करावे?**

अल निनोचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच होतो असे नाही. तर या वातावरणाच्या बदलातून सर्वसामान्य प्रत्येक नागरिकाला जावे लागणार आहे. त्यामुळे हा अल निनो काय हे प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी अशा परिस्थितीत, पाण्याची बचत करावी,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करावे. स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करावे. उष्णतेच्या लाटांपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा.

**कोणत्या देशांवर अल निनोचा प्रभाव ?**

अल निनोचा प्रभाव जागतिक स्वरूपाचा असतो. विशेषतः खालील देश यावर्षी अधिक प्रभावित होणार आहे. यामध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिकेतील काही देश, फिलिपाईन्स, पॅसिफिक महासागरातील बेट राष्ट्रे यांच्यावर अधिक संकट कोसळू शकते. काही भागात दुष्काळ, काही भागात पूर आणि काही ठिकाणी समुद्री परिसंस्थांवर परिणाम दिसून येतो.

**भारतातील कोणती राज्ये अधिक संवेदनशील?**

अल निनोच्या काळात पावसातील तफावत सर्वाधिक जाणवणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांचा उल्लेख केला जातो. तथापि, प्रत्येक वर्षी परिस्थिती वेगळी असू शकते. त्यामुळे या प्रदेशावर अधिक लक्ष भारतीय हवामान खात्याने केले असून त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

**मृग बरसला नाही म्हणजे अल निनोचा प्रभाव**

हे उत्तर सध्या नाही असे आहे. कारण भारतात अनेक वेळा उशिरा पावसाला सुरुवात होते. भारतीय हवामान विभागाच्या मते मान्सूनचे आगमन आणि त्यातील खंड अनेक घटकांवर अवलंबून असतात. अरबी समुद्रातील परिस्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे, पश्चिमी वारे, स्थानिक तापमान आणि इतर महासागरीय घटक यांचाही प्रभाव असतो.

म्हणूनच जून महिन्यात काही दिवस पाऊस उशिरा येणे किंवा खंड पडणे यामागे केवळ 'अल निनो 'च कारणीभूत आहे, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. तथापि यासंदर्भात हवामान शास्त्रज्ञांनी यावर्षी पाऊस उशिरा होईल अशी सूचना केली आहे. 'अल निनो ' च्या प्रभावाबाबत काही कालावधीनंतर हवामान खाते मत व्यक्त करणार आहे तथापि,पाऊस उशिरा येणार हे निश्चित.त्यामुळे,अधिकृत हवामान विभागाच्या निरीक्षणांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

**शासनाच्या काय उपाय योजना सुरू आहे**

महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार, जलसंधारण प्रकल्प, सूक्ष्म सिंचन प्रोत्साहन, पीक विमा, हवामान आधारित कृषी सल्ला आणि दुष्काळ व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजनांवर भर दिला आहे. शासन सातत्याने हवामान परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राज्य शासनाने संभाव्य जल संकटामुळे धरणातील पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्याची महत्त्वाची सूचना केली आहे. सिंचनासाठी पाणी उपसा बंदी लागू केली आहे. धरणातून कालव्यातून नद्या आणि तलावांमधून होणाऱ्या अधिक अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने बंद करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना सूचना**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात हवामान विभाग व राज्याच्या व केंद्राच्या कृषी विभागाशी सल्लामसलत करून शेतकऱ्यांसाठी पेरणीची घाई न करण्याच्या संदेश दिला आहे. अल निनो मुळे पावसात खंड पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, कृषी विभागाच्या सल्ल्यानेच पेरणी करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता अधिकृत हवामान अंदाज, कृषी विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि कृषी विभागाच्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

थोडक्यात,अल निनो ही जगभर परिणाम घडवणारी नैसर्गिक हवामान घटना असली तरी ती अटळ संकट नाही. विज्ञानाधारित नियोजन, अचूक हवामान अंदाज, जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासन-जनसहभाग यांच्या मदतीने तिच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शासनाकडून होणाऱ्या वेळोवेळी सूचना भीती निर्माण करण्यासाठी नाहीत. तर जागरूकता वाढविण्याची आहे. शाश्वत जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि हवामान अनुकूल शेती हीच अल निनोसारख्या आव्हानांना सामोरे जाण्याची सर्वात प्रभावी दिशा ठरू शकते. त्यामुळे शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी कृषी विभागाच्या व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी त्यासाठी सतर्क असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

**– प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)

## सामाजिक, राजकीय आंदोलनातील ४४ खटले मागे घेण्याचा मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल झालेले ४४ खटले मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असून तशी शिफारस शासनाला करण्यात आली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता मंत्री तथा या उपसमितीचे अध्यक्ष ॲड.आशिष शेलार यांनी दिली.

राज्यातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्याबाबत मंत्री ड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या समितीची आज सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली. विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव, अभियोग संचालनालयाचे संचालक, गृह विभागाच्या अधिकाऱ्यांसह राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

यापूर्वी झालेल्या बैठकीत ७७ खटले मागे घेण्यात आले होते; तर आज ४४ खटले मागे घेण्याची शिफारस करण्यात आली.या समितीच्या बैठकीत पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या १३३ अर्जदारापैकी ४४ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणावरील खटले मागे घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला.

मंत्रिमंडळ उपसमितीकडे प्राप्त १३३ अर्जदारापैकी १४ अर्जावर पुन्हा विचार करण्याची शिफारस करण्यात आली असून ही प्रकरणे पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त क्षेत्रीय समितीपुढे ठेवण्यात येतील; तसेच ३५ प्रकरणापैकी काही खटले निकाली निघाले होते तर ३२ खटले हे समितीच्या कार्यकक्षेत न येणारे होते. आज आलेल्या खटल्यापैंकी केवळ ८ खटले प्रलंबित राहिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, आंदोलक, विचारधारात्मक चळवळींतील सहभागी यांच्यावर विनाकारण खटले दाखल करण्यात आले होते. अशा अनावश्यक खटल्यांपासून त्यांची मुक्तता करणे;हे सरकारचे उत्तरदायित्व असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

मागे घेण्यात आलेल्या खटल्यांमध्ये गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, सामाजिक कार्यक्रम, गोवंश संरक्षण आंदोलन, कामगार आंदोलन अशा विविध खटल्याच़ा समावेश आहे.

## दिव्यांग शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत अधिकारांचे विकेंद्रीकरण; थकीत वेतन मंजुरीचे अधिकार आता जिल्हास्तरावर - मंत्री अतुल सावे



**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा, कार्यशाळा आदी संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाच्या देयक प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी दिव्यांग सक्षमीकरण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार थकीत वेतन अदा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद; तसेच मुंबई शहर व उपनगरातील जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले असल्याची माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी दिली.

मंत्री अतुल सावे म्हणालेकी, यापूर्वी थकीत वेतन अदा करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेणे आवश्यक होते. मात्र, नियमित व थकीत वेतन वितरणाची प्रक्रिया अधिक गतिमान आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने आता संबंधित अधिकाऱ्यांना हे अधिकार देण्यात आले आहेत. जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रकरणांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या माध्यमातून तपासणी करून थकीत वेतन निधी वितरित करावे. तर मुंबई शहर व उपनगरातील प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी यांनी संबंधित लेखाधिकारी यांच्या माध्यमातून तपासणी करून थकीत वेतन प्रस्तावांना मंजुरी देण्यात येणार आहे.

थकीत वेतन अदा करण्यापूर्वी संबंधित रक्कम नियमांनुसार देय आहे की नाही, याची निश्चित करण्यात आलेल्या तपासणी सूचीप्रमाणे पडताळणी करणे बंधनकारक राहणार आहे. न्यायालयीन निर्णयांमुळे देय झालेल्या थकबाकीच्या प्रकरणांसह इतर सर्व प्रकारच्या थकीत वेतनाच्या प्रकरणांनाही ही अट लागू असेल.

दरम्यान, यापूर्वी अदा करण्यात आलेल्या थकबाकीच्या प्रकरणांची विशेष तपासणी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांच्या विशेष पथकाकडून या प्रकरणांची सविस्तर चौकशी करण्यात येणार असून ९० दिवसांत शासनाला अहवाल सादर केला जाणार आहे. तपासणीत नियमबाह्य पद्धतीने थकबाकी किंवा इतर लाभ देण्यात आल्याचे आढळल्यास संबंधितांकडून त्या रकमेची वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दिव्यांगांच्या विशेष शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाच्या प्रकरणांचा निपटारा अधिक जलद व पारदर्शक पद्धतीने होण्यास मदत होणार असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

# शिक्षकांना हवी सन्मानाची वागणूक

शिक्षणबोध : संदीप वाकचौरे

आपल्या देशात कधीकाळी गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. त्या पद्धतीमुळे देशात शिक्षकाचे स्थान अनन्यसाधारण होते. त्याकाळी शिक्षक म्हणजे गुरू असा विचार होता. शिक्षकांना त्यावेळी गुरुजी असे संबोधले जात असे. त्या शब्दांमध्ये प्रचंड अंतर आहे. गुरुजी हा जीवन उन्नतीचा विचार प्रतिपादन करत असतो. अज्ञानाचा अंधकार नष्ट करण्यासाठी प्रयत्न करतो. गुरुजी म्हणजे ज्ञानासाठी समर्पणाने काम करणारी व्यक्ती. अखंड ज्ञानसाधना सुरू असते. आपल्या शिष्याच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पडावा म्हणून सातत्याने कार्यरत असते. गुरूचे स्थान हे सातत्याने उंचावलेले असते. शिक्षक हाही गुरुजी होऊ शकतो. पण त्याकरिता ही वाट चालण्याची गरज असते. या वाटा चालणे जे लोक पसंत करतात ते शिक्षकही गुरुस्थानी पोहोचतात. खरेतर अलीकडे शिक्षक हा नोकर झाला आहे. मात्र शिक्षकांचे स्थान नोकर म्हणून कधीच नव्हते. गुरुजींचे स्थान लोकांच्या मनामनात आणि हदयावर कोरलेले असते. परिवर्तनाच्या वाटेवरील एक महत्त्वाचा दुवा म्हणून गुरुजींकडे पाहिले जात होते.

गुरुजी केवळ विद्यार्थ्यांच्या जीवनापुरते मर्यादित काम करत नाही, तर ते समाज आणि राष्ट्र डोळ्यासमोर ठेवून अखंड कार्यरत असतात. ते समाज जी-वनाला अंधकाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाणारे प्रकाशदूत असतात. गुरुजींच्या हाती जो प्रकाश होता, तो प्रकाश ज्ञानाचा होता. समाजातील अज्ञानाचा अंधकार नष्ट करून आपल्याला समाजाच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश प्रज्वलित करायचा आहे अशा अपेक्षेने गुरुजी काम करायचे. त्यामुळे समाजावर जेव्हा जेव्हा संकटे येतात तेव्हा तेव्हा गुरुजी स्वतः पुढे होते, कार्यरत होते. साने गुरुजींनी निवडलेली वाट ही खर्या अर्थाने त्यांची होती. समाजाला शहाणे करण्यासाठी देखील ही माणसे अखंड कार्यरत राहात. त्यांच्या हाती ज्ञान प्रकाश असतो, मूल्यांच्या पेरणीचा विचार असतो. त्यामुळे इतिहासाची पाने चाळली तर आपल्याला सहजतेने लक्षात येईल की, गुरुजींचे स्थान अनन्यसाधारण असे होते. आज गुरुजींचे रूपांतर शिक्षकांमध्ये झाले आहे. त्याला सरकारी कर्मचारी समजले जाऊ लागले. शिक्षणाच्या प्रक्रियेत शिक्षक वेतन घेऊन काम करतो असे समजून, त्याला येथील बाजारू शैक्षणिक वातावरणात नोकर मानले जाऊ लागले. त्यामुळे अलीकडच्या कालखंडात आपल्याला शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप बदलून बाजारू व्यवस्था उभी राहत आहे. या परिस्थितीत शिक्षक हा देणारा आणि विद्यार्थी हा घेणारा ठरतो आहे. बाजारू संकल्पनाचा विचार करता शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते ग्राहक आणि विक्रेता अशी बनली आहेत. अशा परिस्थितीत आपल्याला पुन्हा शिक्षणाचे रूप बदलायचे असेल, तर शिक्षकांचा सन्मान करण्याची गरज आहे. हे चित्र बदलले नाही, तर त्यातून कोणाचे किती नुकसान होते, यापेक्षा समाज व राष्ट्राचे मात्र निश्चित अधिकाधिक नुकसान होते हे निश्चित आहे. त्यामुळे शिक्षकांनी गुरुजी बनण्याची अपेक्षा आहे. त्याच बरोबर हा प्रवास करत असताना शिक्षकांना समाजाने देखील सन्मान देण्याची आवश्यकता आहे. मुळात शिक्षकाने गुरुजी बनावे असे वाटत असेल, तर समाजाचे देखील आपले काही कर्तव्य आहे हे लक्षात घेण्याची गरज आहे. आज आपल्याकडे कर्तव्याचा भाव संपुष्टात येतो की काय अशी शंका सातत्याने समाजमनात निर्माण होते आहे.

गुरु-शिष्य नाते-समर्थ रामदासांनी गुरूच्या संदर्भाने आपण काय करण्याची गरज आहे, त्या संदर्भातील प्रतिपादन केलेला विचार नितांत गरजेचा आहे. क्षेत्र कोणतेही असू दे गुरू आणि शिष्य यांच्यातील नाते अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी समर्थांनी चार स्तंभांचे प्रतिपादन केले आहे. त्या चार गुणांचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा त्यात प्रामाण्य, आदर, नम्रता आणि शरणागती याचा विचार करण्यात आला आहे. शिक्षक हे व्यक्तीच्या जीवनाला दिशा देत असतात. जीवन उन्नतीचा विचार ते प्रतिपादन करतात. विद्यार्थ्यांच्या जीवनातील अज्ञानाचा अंधकार नष्ट करत त्याच्या जीवनात ज्ञानरूपी प्रकाशाचा दिवा प्रज्वलित केला जात असतो. त्याच बरोबर शिक्षक जे काही शिक्षण-विचाराची पेरणी केली जात असतात, त्यामागे मूल्याच्या विचारांची पेरणीचा उद्देश असतो. समर्थ म्हणतात की,



**गुरुसी करावे**
**प्रामाण्य।**
**गुरुसी करावे**
**आदर।**
**गुरुसी करावे**
**शरण।**
**गुरुसी करावे**
**नम्रता।।**

दासबोधामध्ये गुरु-शिष्य नात्याचे चार आधारस्तंभ म्हणजे हे चार गुण आहेत. गुरू हे शिष्याच्या जीवनाला दिशा देतात आणि शिष्याच्या प्रत्येक पाऊलवाटेवर जे शिक्षण घडत असते, त्याला खरे मूल्य प्राप्त करून देत असतात. त्याच बरोबर समर्थ म्हणतात की, गुरूसी करावे प्रामाण्य असे समर्थ सांगत आहेत. गुरूच्या शिकवणीला प्रामाण्य देणे म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनाला सर्वोच्च स्थान आणि मान्यता देणे आहे. शिष्याने गुरूच्या शब्दांना सत्य मानून त्यांचे पालन करणे हेच प्रामाण्य आहे. मुळात गुरूवर विश्वास असण्याची आवश्यकता आहे. गुरूवरील श्रद्धा अधिक महत्त्वाची आहे. कधी काळी महाभारतात वेद आणि अरूनी नावाचे शिष्य होते. गुरूंनी त्यांना शेताचे पाणी अडवण्यास सांगितले. दुर्दैवाने पाणी अडवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण बांध घालून पाणी अडवणे शक्य झाले नाही. पाण्याचा वेग अत्यंत अधिक होता. त्यामुळे माती वाहून जात होती. पाणी काही केल्या अडवणे शक्य होत नव्हते. आता गुरूंचा आदेश होता, आपण पाणी नाही अडवले तर गुरूंच्या आदेशाचे काय होणार ही चिंता त्यांना सतावत होती. अखेर वेद त्या बांधावर आडवे पडले आणि पाणी अडवू लागले. आता वाहणारा पाण्याचा प्रवाह कमी झाला होता. पाणी अडवले गेले होते. मात्र सूर्य मावळतीला गेला तरी शिष्य परत न आल्याने गुरूंनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. गुरूला आपला शिष्य अवतीभोवती कोठेच दिसत नव्हता. मग त्यांनी हाका मारण्याचा प्रयत्न केला. प्रतिसाद मिळत होता, पण वेद कोठेच दिसत नव्हता. त्यामुळे गुरुजी पुन्हा चिंतेत पडले. अखेर त्यांनी कोठे आहे असे विचारले तेव्हा त्यांनी बांधावर झोपलो आहे, पाणी अडवतो आहे. काही केल्या माती टाकून पाणी अडवले जात नव्हते. म्हणून मी आडवा पडून पाणी अडवतो आहे. हे पाहिल्यावर गुरूंच्या डोळ्यातदेखील पाणी आले. मुळात हा विश्वास शिष्यांचा गुरुजींनी मिळवला होता. त्यासाठी गुरू आणि शिष्य हे दोन्ही महत्त्वाचे आहेत. अलिकडे गुरूच्या विचारावर निष्ठा, प्रेम, विश्वास उरलेला नाही. अर्थात पूर्वी गुरू आणि शिष्य यांच्या ज्ञानातील अंतर कितीतरी पट अधिक होते. गुरू ज्ञानाची साधना करत होते. स्वतः ला समर्पणाच्या भावनेने गुरू ज्ञानाच्या शोधासाठी कार्यरत राहात होते. त्यातून ज्ञानाची उंची वाढत होती. त्यामुळे गुरू काही केले तरी नेहमीच आदराला पात्र ठरत होते. शेवटी प्रामाण्य लाभावे असे वाटत असेल, तर ज्ञानाचे तेज गुरूंच्या चेहर्यावर दिसायला हवे. तो आत्मविश्वासही दिसायला हवा. आज या प्रामाण्याची वाट काहीशी सैल झाली आहे, याचे कारण ज्ञानाची अंखड साधना काहीशी थांबली आहे. त्यामुळे प्रामाण्याची वाट अधिक असण्यासाठी शिक्षक म्हणून सातत्याने प्रयत्न करण्याची गरजही अधोरेखित होते आहे. शिक्षकांनी सांगितलेल्या मार्गाने विद्यार्थी चालू लागतो तेव्हा त्याला यश मिळण्यास मदत होत असते. गुरू शिष्य हे नाते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्वीकारण्यात आले आहे. अगदी आध्यात्मिक क्षेत्रात तर गुरूचे स्थान सर्वोच्च मानले गेले आहे. त्या क्षेत्रात साधक गुरूच्या सांगण्याप्रमाणे जप, ध्यान, धारणा, प्रार्थना, सेवा करत असतो. हे सर्व करताना केवळ प्रामाण्याची भूमिका निभावत असतो. त्यामुळे शिष्याला आत्मिक शांती लाभते हे अनेकदा अनुभवाचे बोल शिष्यांनी नमूद केले आहेत.

ज्ञानाचा स्रोत

त्याच बरोबर गुरुसी करावे आदर असेही समर्थ सांगत आहेत. याचा अर्थ सातत्याने गुरूचा आदर करण्याची गरज आहे. गुरूचा आदर म्हणजे ज्ञानाचा आदर करणे. गुरू हा ज्ञानाचा स्रोत असतो. त्यामुळे त्या ज्ञानाचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. अशा ज्ञानसाधक असलेल्या गुरूंचा सन्मान करणे हे प्रत्येक शिष्याचे कर्तव्य आहे. आपल्या गुरूच्या ज्ञानावर प्रत्येक शिष्याचा विश्वास असतो. त्याच बरोबर गुरूच्या ज्ञानाविषयी शंका नाही. आपल्या गुरूला कमी लेखले जात नाही, गुरूची प्रत्येक गोष्ट अत्यंत आदराने ऐकत असतो. गुरूंच्या मार्गदर्शनाने समाजहिताचे कार्य करण्याचा प्रयत्न शिष्य करत असतात. आपल्या गुरूला अत्यंत चांगला सन्मान दिला जात असतो. गुरूचा सन्मान होताना त्यांच्या ज्ञानावरील विश्वास आणि श्रद्धा अधोरेखित होत असते. मुळात गुरूला गुरुस्थानी पोहचवण्यासाठी ज्ञानाचा प्रवास करावा लागत असतो. गुरुपद हे केवळ पदवीने मिळत नाही. पदवी हाती असली, तर नोकरी मिळेल, पण गुरुपदासाठीचा प्रवास शिक्षक म्हणून स्वतःलाच करावा लागेल. तो प्रवास जितका दीर्घ आणि सातत्यपूर्ण असेल, तितका प्रवास गुरूपर्यंत होत जाणार आहे.

समर्थ म्हणतात की, गुरुसी करावे शरण-शरणागती म्हणजे गुरूच्या मार्गदर्शनात्मक भूमिकेला पूर्णपणे स्वतःला अर्पण करणे. शिष्याने आपण कितीही श्रीमंत असलो, परिस्थिती कितीही संपन्न असली, तरी अहंकार बाजूला ठेवून गुरूच्या शिकवणीला शरण जाणे अपेक्षित आहे. शिष्य आपल्या शंका, अडचणी गुरूच्या चरणी ठेवतो आणि त्यांचे मार्गदर्शन स्वीकारतो. मुळात गुरू आपल्या शिष्याच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास बांधील असतात. शिक्षक ही विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण होईल अशा भूमिकेने संवाद करत असतो. त्याच्या मनातील प्रत्येक प्रश्नांच्या उत्तराचा शोध घेण्यासाठी दिशा दाखवत असतो. त्या दिशेने प्रवास घडावा यासाठी शिक्षकाने सातत्याने प्रयत्न करणे अपेक्षित आहे. अध्यापनाचा अर्थच आहे, मनात प्रश्न निर्माण करणे. त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी शिष्याने सातत्याने प्रयत्न करत राहायला हवे. जेव्हा विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे मिळणे शक्य होत नाही, तेव्हा त्याचे उत्तर देण्यास शिक्षक बांधील असायला हवेत. तसे घडले तरच शिक्षकांच्या प्रति आदराचा भाव उंचावण्याची शक्यता आहे. शेवटी शिक्षकाची उंची विद्यार्थ्यांच्या मनात सर्वाधिक असते. त्यामुळे त्या उंचीला धक्का न लागता, ती वाढत राहील यासाठी प्रयत्न करायला हवेत. तो मार्ग फक्त अखंड ज्ञानसाधनेतून जातो हेही लक्षात घ्यायला हवे.

नम्रता हवी त्याचवेळी समर्थ नम्रते विषयी देखील सांगता आहेत. नम्रता म्हणजे विनम्रपणे वागणे, अहंकार न ठेवणे. शिष्याने गुरूशी नम्रतेने वागले पाहिजे; कारण नम्रतेतूनच ज्ञान ग्रहण करता येते. अर्थात अंहकार जसा गुरूमध्ये असू नये, त्याप्रमाणे शिष्यामध्ये देखील असता कामा नये. ज्ञानाची साधना करायची असेल, तर नम्रता महत्त्वाची असते. मुळात जेथे आपल्याला नम्रतेची वाट चालायची आहे, तेथे आपण शून्य असण्याची गरज आहे. अलीकडे अर्ध्या हळकुंडाने पिवळे होण्याची वृत्ती वाढते आहे. अशा परिस्थितीत आपल्यातील अंहकार वाढताना दिसतो आहे. मुळात बुद्ध जे म्हणाले होते की, ज्ञानाचा मार्ग हा नेहमीच नम्रतेच्या वाटेने जात असतो. आपण शून्य आहोत ही जाणीवच ज्ञानाच्या दिशेने प्रवास घडवत असते. आपल्याला सारे कळते, माहीत आहे असे वाटणे म्हणजे अज्ञानाची वाट आहे. असा विचार मनात आला की, मात्र आपल्याला फार काही कळत नाही असे वाटणे म्हणजे ज्ञानाची वाट आहे. याचे कारण या विश्वात प्रचंड ज्ञान साठवलेले आहे. आज आपण ज्ञानाची वाट चालण्याकरिता अंहकाराचा लोप करण्याची गरज आहे. आपण जोवर अहंकाराचा लोप करत नाही, तोवर ज्ञानाच्या वाटेचा प्रवास घडण्याची शक्यता नाही. विद्यार्थी गुरुंच्या पायाशी बसून विनम्रतेने प्रश्न विचारतो. हीच खरी नम्रता आहे. या ओवीत समर्थांनी गुरु-शिष्य नात्याचे चार आधारस्तंभ स्पष्ट केले आहेत. आजच्या काळात तंत्रज्ञान, पुस्तके आणि इंटरनेटमुळे ज्ञान सहज उपलब्ध झाले आहे. तरीही गुरूचे महत्त्व कमी झालेले नाही. ते होण्याची शक्यता देखील नाही. गुरू हा केवळ माहिती देणारा नसून जीवनमूल्ये रुजवणारा, सदाचार शिकवणारा आणि आत्मज्ञानाचा मार्ग दाखवणारा मार्गदर्शक आहे. याचा अर्थ आहे की, गुरूशी प्रामाण्य, आदर, शरणागती आणि नम्रता ठेवली तरच शिष्याला खरी विद्या, सदाचार आणि आत्मज्ञान प्राप्त होते. या गोष्टी साध्य करणे हीच आपल्या जीवनाची साध्यता आहे. ती वाट सापडली तर जीवनाचे ध्येय साध्य होण्यास मदत होणार आहे.




## डेबिट कार्ड वापरणार्‍यांच्या लोकसंख्येत प्रचंड घट

अनेक दशकांपासून पैसे काढण्यासाठी भारतीय सर्वांत विश्वासार्ह माध्यम म्हणून डेबिट कार्ड वापरत आले आहेत. लोक 'एटीएम'मधून पैसे काढण्यासाठी डेबिट कार्डला सुविधाजनक मानत आले आहेत; परंतु रिझर्व्ह बँकेची नवीन आकडेवारी पाहिली, तर डेबिट कार्ड वापरणार्या लोकांच्या संख्येत घट झाली आहे. नव्या आकडेवारीप्रमाणे गेल्या दोन वर्षांत डेबिट कार्ड वापरणार्यांच्या संख्येत ४४ टक्के घट झाली आहे. 'एटीएम' मधून पैसे काढणार्या लोकांच्या संख्येत कमतरता आली आहे. केंद्रीय बँक रिझर्व्ह बँकेच्या २०२६ च्या वार्षिक रिपोर्टनुसार डेबिट कार्ड देवाणघेवाण २०२३-२४ मध्ये २२ हजार ८६० लाखांवरून घटून २०२४-२५ मध्ये १६ हजार १२० लाखांवर आणि २०२५-२६ मध्ये १२ हजार ८०२ लाखांवर राहिली आहे. हे आकडे सांगतात, की गेल्या दोन वर्षांमध्ये सुमारे ४४ टक्के घसरण झाली आहे. 'एटीएम'मध्ये कमतरता येण्यामागे कारण 'युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस' म्हणजे 'यूपीआय'च्या वापरात झालेली वाढ आहे. आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये 'यूपीआय' ची घेवाणदेवाण १३,११,२९५ लाखांनी वाढून २४,१६,१६९ लाख रुपये झाली आहे. ही वाढ सुमारे ८४ टक्के आहे. आता लोक किराणा, भाजी वा अन्य गरजेच्या सामानाच्या खरेदीपासून वीज आणि पाण्याचे बिलद-खील 'यूपीआय'द्वारे करत आहेत. आता 'यूपीआय पेमेंट' हे डिफॉल्ट पेमेंट बनले आहे. यामुळे आता डेबिट कार्ड स्वाईप वा टॅप करण्याची गरज कमी झाली आहे. याशिवाय अनेक बँका अशाही आहेत, ज्या आता मोबाईल बँकींग ॲप आणि 'यूप-ीआय एनेबल्ड प्लेटफॉर्म'च्या माध्यमातून विनाकार्ड रोख रक्कम काढण्याची सुविधा देत आहेत. त्यामुळे डेबिट कार्ड सोबत बाळगण्याची गरज नाही. डेबिट कार्ड सर्वसाधारणपणे सेव्हींग अकाऊंट सोबत सक्तीचे केले गेले आहे. तसेच कोणत्याही अर्जाशिवाय दिले जात आहे. तसे क्रेडिट कार्डबाबत होत नाही. अहवालानुसार लोक डेबिट कार्डाच्या तुलनेत क्रेडिट कार्डचा उपयोग वाढवत आहेत. एप्रिल २०२६ मध्ये क्रेडिट कार्डवरून देवाणघेवाणीच्या प्रमाणात २३ टक्के वाढ झाली असून वापराच्या मूल्यात सात टक्के वाढ झाली आहे.

## पोटाचा प्रमुख आजार म्हणजे मूळव्याध



मूळव्याध ही एक अत्यंत त्रासदायक समस्या आहे. बद्धकोष्ठता, अयोग्य आहार आणि बैठी जीवनशैली ही याची मुख्य कारणे आहेत. फायबरयुक्त आहार, भरपूर पाणी, नियमित व्यायाम आणि घरगुती उपायांनी मूळव्याधीचा त्रास आटोक्यात ठेवता येतो आणि आराम मिळतो.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स**-वैवाहिक जीवन आरोग्यासाठी चांगले मानले जाते. पण हे सुद्धा खूप आवश्यक आहे कि सेक्स चा आनंद घेण्यासाठी योग्य मार्ग जाणून घेतला पाहिजे. या लेखात दिलेल्या सोप्या टिप्स चा वापर करून तुम्ही तुमचे सहवास लाइफ मध्ये सुधार आणू शकता.१. सेक्स कण्याआधी ओरल सेक्स करणे महत्वाचे आहे. ही क्रिया सहवास मध्ये महत्वाची भूमिका बंजावते. या क्रियेमुळे तुम्ही स ह व - ासचा आनंद खूप चांगल्या प्रकारे घेऊ शकता. २. परुष

## २ Joke विनोद




**शिक्षक : गव्हाचे सगळ्यात जास्त उत्पादन कोठे होते?**
**विद्यार्थी : शेतात.**

## ३ Message संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .


## ४ Thought सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**
**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।**
**मराठीत अर्थ**
आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**
१. मागाहून, मग
३. कथांमधील भला मोठा नाग
६. सापाची एक जात
९. तळे, धरण, विहीर इ.
११. एक मंगल वाद्य
१३. वागणूक
१४. परमेश्वर
१५. मोठा डेरेदार वृक्ष
१८. विल्हेवाट, निकाल (लावणे)
१९. अंगावरील बारीक केस
२२. कबूतर
२३. चंद्र, एक वनस्पती
२५. मुलगा-मुलगी
२८. अत्यंत धनाढ्य मनुष्य
३२. काळ्या तोंडाचा हुप्प्या
३३. करसेवेचा अपभ्रंश - सेवा
३४. रोग झालेला, आजारी
३५. सारखा
३६. सदोदित
३७. चिवचिवाट
३९. हुबेहुब प्रत बनवणारा
४१. मांडणी, सजावट
४२. शुष्कता
४३. धुणे
४७. धुसफूस
४९. धातूचा धागा
५०. बुजणारी
५१. तारीख
५२. पद्धतीप्रमाणे
५३अ. पाणी
५४. मांडी न घालता बसलेला
५५. नेहमी, वारंवार
५७. खाट, चौपाई
५८. युवराज
६०. सापाची एक जात
६१. आपला नसलेला
६३. बातमीदार
६५. घोडागाडी
६६. धमकी
६७. त्रास, वैताग, बडबड
६९. पाठविलेला
७१. रवाळ
७३. मूळ आधार
७४. तिथीप्रमाणे बदलत जाणारा चंद्राचा आकार
७६. डोळे
७८. हाताचा तळवा
७९. पाप
८०. एकावर एक रचलेल्या वस्तू (उदा. गोवऱ्या, पुस्तके)
८१. पादत्राण

**उभे शब्द**
१. ठोंब्या माणूस, शंकराचे वाहन
२. दुलई
३. नष्ट
४. मृत
५. रमापती
६. जमीनदोस्त
७. तृण
८. द्रव्य, पैसा
१०. प्रेत (हिंदी)
१२. नूतन
१६. भारतीय चलन
१७. पाठवणी
२०. जमीनदार
२१. भूतकाळ
२३. सुविधा
२४. पाठीतील हाडांच्या माळेतील मणी
२६. पुरुष
२७. पाताळ
२९. न वापरलेला
३०. नसलेला
३१. श्रीरामाचे स्तोत्र
३२. गंध
३४. जाड पोळी
३७. तंबूची कापडी भिंत
३८. साखळी लावलेला दिवा
३९. बोटाच्या टोकावरील आवरण
४०. लक्षाचा आकडा
४२. तापापूर्वीचे शहारे
४४. वेल
४५. फार गार वा उष्ण नसलेले
४६. निर्लज्ज
४८. साठ मिनिटे
५०अ. ढग
५३. चापट, मऊ पदार्थाचा आघात
५४. पार्वती
५४अ. डुक्कर
५६. सुतळीच्या धाग्याचे कापड
५९. मदत
६०. संगीतातील एक राग
६१. झटकन
६२. मनोहरी, रम्य
६४. विरोध
६६. प्रत्येक, किंमत
६७. काळिमा, बट्टा
६८. डाक, पत्र
७०. श्वासाचा अवयव
७२. राक्षस
७५. लत्ताप्रहार
७७. जून्या जखमेची खूण

**आडवे उत्तर**
१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ. जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३. वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

**उभे उत्तर**
१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रव-ानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरम गरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### बदला पुरा झाला..! अफगाणिस्तानला १०१ धावांनी लोळवले

दिल्ली–श्रीलंकेत खेळल्या जाणाऱ्या तिंरगा एकदिवसीय मालिकेत इंडिया–ए संघाने तुफानी कामगिरीच्या जोरावर फायनलमध्ये धडक मारली. मालिकेतील पाचव्या सामन्यात इंडिया–ए संघाने अफगाणिस्तान–ए चा तब्बल १०१ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. दांबुला येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारतीय संघाने केवळ आपल्या मागील पराभवाचा बदलाच घेतला नाही, तर ४ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.
भारतीय फलंदाजांची दमदार कामगिरी या सामन्यात अफगाणिस्तानने टॉस जिंकून भारताला आधी फलंदाजीसाठी आमंत्रित केले. इंडिया–ए ची सुरुवात अत्यंत वादळी झाली. युवा सलामीवीर प्रियांश आर्यने ५८ धावा आणि वैभव सूर्यवंशीने ३८ धावा करत पहिल्या विकेटसाठी अवघ्या ८ षटकांत ७५ धावांची तुफानी भागीदारी केली. प्रियांशने आपल्या खेळीत ९ चौकार आणि १ षटकार ठोकला.
सलामीवीर बाद झाल्यानंतर कर्णधार तिलक वर्मा आणि यष्टिरक्षक फलंदाज कुमार कुशाग्र यांनी डावाची सूत्रे हाती घेतली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी १०४ धावांची शतकीय भागीदारी रचली. तिलक वर्माने ५९ धावा तर कुमार कुशाग्रने ५८ धावांचे योगदान दिले.

### रोहित शर्माची ऐतिहासिक कामगिरी; लिस्ट ए क्रिकेटमध्ये १४,००० धावांचा टप्पा पार

लखनऊ,१७ जून (पीएसआय)
भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी फलंदाज रोहित शर्माने बुधवारी अफगाणिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात एक नवा विक्रम रचला आहे. त्याने लिस्ट–ए क्रिकेटमध्ये चौदा हजार धावांचा टप्पा पार केला आहे. अफगाणिस्तानविरुद्ध सामना सुरू होण्यापूर्वी त्याला फक्त दहा धावांची गरज होती; मैदानावर उतरताच त्याने ही कामगिरी सहजपणे पूर्ण केली. या सामन्यात त्याने ३९ चेंडूंत ४८ धावांची खेळी केली. यात त्याने सहा चौकार आणि दोन षटकारही मारले. रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकूण ११ हजार ६४० धावा केल्या आहेत. रोहित शर्माची एकूण कसोटी क्रिकेट आकडेवारी ही स्वप्नवत आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत एकूण ३५७ सामने खेळले असून, ३४५ डावांमध्ये ४६ पेक्षा जास्त सरासरीने चौदा हजार ०३८ धावा केल्या आहेत. या प्रदीर्घ आणि यशस्वी प्रवासात, रोहितने ३७ उत्कृष्ट शतके आणि ७४ अर्धशतके झळकावली आहेत, जी त्याच्या सातत्याची आणि मोठ्या खेळी करण्याच्या क्षमतेची साक्ष देतात. रोहित शर्माने या ऐतिहासिक खेळीदरम्यान अत्यंत आक्रमक फलंदाजी केली. त्याने अफगाण गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला आणि ४८ धावांची वेगवान खेळी केली. या खेळीदरम्यान रोहितने सहा चौकार आणि दोन उत्तुंग षटकारही मारले. मात्र, अफगाणिस्तानचा लेग–स्पिनर रशीद खानच्या फिरकी चेंडूवर आपली विकेट गमावल्याने रोहित शर्मा अर्धशतकापासून वंचित राहिला. रोहित या सामन्यात अत्यंत आक्रमक खेळी करताना दिसला. सुरुवातीपासूनच अफगाणिस्तानच्या गोलंदाजांवर दबाव टाकला.

### रोनाल्डोलाही टाकले मागे; विश्वचषकातील सर्वात वयस्कर खेळाडू चर्चेत!

दिल्ली–अर्जेंटिना विरुद्ध अल्जेरिया या सामन्यामध्ये अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेसीने सामन्यात सलग तीन गोल करुन धुमाकुळ घातला. त्याच्या या कामगिरीने आता जगभरामध्ये त्याचे कौतुक केले जात आहे. आता मेसीचा सामना झाल्यानंतर क्रिस्टियानो रोनाल्डोच्या सामन्याची चाहत्यांना प्रतिक्षा आहे. पोर्तुगीज फुटबॉलचा सुपरस्टार ख्रिस्तियानो रोनाल्डो वयाच्या ४१ व्या वर्षी आपला सहावा फिफा विश्वचषक खेळत असला तरी, तो या विश्वचषकाचा सर्वात वयस्कर खेळाडू नाही. स्कॉटलंडचा गोलरक्षक क्रेग गॉर्डन २०२६ च्या स्पर्धेत खेळणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनून फिफा विश्वचषकाच्या इतिहासात आपले नाव कोरणार आहे.स्कॉटलंडचा गोलकिपर हा वयाच्या ४३ व्या वर्षी फीफा विश्वचषक खेळताना दिसत आहे. या गोलकिपरने त्याच्या संघासाठी प्रभावी कामगिरी केली आहे, फुटबॉलच्या सर्वात मोठ्या मंचावर अनुभव व वचनबद्धता किती मौल्यवान आहे हे त्याने सिद्ध केले आहे. स्कॉटलंडच्या विश्वचषक संघात समावेश हे खेळाडूसाठी तर महत्वाचे आहेत त्याचबरोबर संघासाठी देखील महत्वाचे आहे. विकेटकपर बद्दल विशेष सांगायचे झाले तर या खेळाडूंच्या फुटबॉल करिअरमध्ये उत्तरार्धात झालेल्या गंभीर दुखापतीनंतर सुद्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याच्या पुनरागमनाचे चाहते, संघसहकारी आणि फुटबॉल तज्ञांनी त्यांचे कौतुक केले आहे. १३ जून रोजी (भारतात १४ जून) स्कॉटलंड विरुद्ध हैती यांच्यात सामना झाला. त्याने अनेक विक्रम मोडले आहेत, तो आधुनिक फुटबॉलमधील दीर्घायुष्याचे एक मोठे उदाहरण



# मानधनने केला वर्ल्ड रेकॉर्ड!

## पुरूष व महिला क्रिकेट इतिहासात 'ही' कामगिरी करणारी पहिलीच फलंदाज

### ४७ चेंडूंमध्ये ७४ धावांची शानदार खेळी

### स्मृतीने ६०० चौकारांचा टप्पा पूर्ण



**टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक चौकार लगावणारे फलंदाज**
(पुरूष–महिला दोन्ही)
स्मृती मानधना - ६०४ चौकार
सुझी बेट्स - ५२१ चौकार
चमारी अट्टापट्टू - ४९३ चौकार
बाबर आझम - ४७७ चौकार
बेथ मुनी - ४५९ चौकार
पॉल स्टर्लिंग - ४४९ चौकार

**नवी दिल्ली:** स्मृती मानधनाने टी–२० विश्वचषक २०२६ मध्ये नवा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. नेदरलँड्सविरूद्ध सामन्यात तिने ही कामगिरी केली.
टीम इंडियाची क्वीन स्मृती मानधनाने टी–२० क्रिकेट इतिहासात आपलं नाव सुवर्णअक्षरांनी नोंदवलं आहे. स्मृतीने नेदरलँड्सविरूद्ध टी–२० विश्वचषक २०२६ मधील सामन्यात एक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केला. या सामन्यात मानधनाने अवघ्या ४७ चेंडूंमध्ये ७४ धावांची शानदार खेळी साकारली. तिच्या डावात ११ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. आक्रमक फलंदाजी करत तिने नेदरलँड्सच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवलं. यादरम्यान तिने असा विक्रम केला आहे की आजवर पुरूष व महिला क्रिकेटमध्ये तो कोणालाच जमला नाही. भारतीय संघाने नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी पाचारण करण्यात आलं. स्मृती मानधना व शफाली वर्माच्या जोडीने कमालीची सुरूवात करत संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या दोघींनी मिळून पहिल्या विकेटसाठी ११५ धावांची भागीदारी रचली. यादरम्यान स्मृतीने ६०० चौकारांचा टप्पा पूर्ण केला. या ऐतिहासिक विक्रमासह स्मृती मानधनाने पुन्हा एकदा जागतिक क्रिकेटमधील आपलं वेगळेपण सिद्ध केलं आहे. महाराष्ट्राची ३० वर्षीय डावखुरी फलंदाज सलामीवीर स्मृती मानधना ही पुरुष आणि महिला आंतरराष्ट्रीय टी–२० क्रिकेटच्या इतिहासात ६०० चौकारांचा टप्पा गाठणारी जगातील पहिली खेळाडू ठरली. स्मृती मानधनाने नेदरलँड्सविरूद्ध ७४ धावांच्या खेळीमध्ये लगावलेल्या या ११ चौकारांमुळे महिलांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एकूण चौकारांची संख्या ६०४ वर पोहोचली आहे. महिलांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक चौकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ती सुझी बेट्स आणि चमारी अट्टापट्टू यांच्याही पुढे, अव्वल स्थानावर विराजमान आहे. बेट्सने १८३ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील १७६ डावांत ५२१ चौकार मारले आहेत, तर अट्टापट्टूने १५९ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत ४९३ चौकार लगावले आहेत. तर पहिल्या स्थानी असलेल्या स्मृतीने १६८ सामन्यांमध्ये ६०४ चौकार लगावले आहेत.पुरुषांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम बाबर आझमच्या नावावर आहे. पाकिस्तानच्या बाबरने १४५ टी–२० सामन्यांच्या १३६ डावांमध्ये ४७७ चौकार मारले आहेत. त्याच्यापाठोपाठ पॉल स्टर्लिंगचा क्रमांक लागतो, ज्याने १६३ टी–२० सामन्यांत ४४९ चौकार मारले आहेत.

**नेशन्स कप हॉकी स्पर्धा**

# जपानचा पराभव करत भारत उपांत्य फेरीत

**ऑकलंड : कर्णधार सलीमा टेटे आणि लालरेम्सियामी यांच्या गोलच्या जोरावर भारतीय महिला हॉकी संघाने मंगळवारी जपानला २–१ ने हरवून एफआयएच नेशन्स कपच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे.या स्पर्धेतील भारताचा हा दुसरा विजय होता. त्यांनी आपल्या पहिल्या सामन्यात अमेरिकेला हरवले होते. या स्पर्धेचा विजेता संघ पुढील हंगामात एफआयएच प्रो लीगमध्ये खेळेल. गेल्या हंगामात भारत या स्पर्धेतून बाहेर पडला होता. भारताच्या सलग दुसर्या विजयामुळे त्यांचे सहा गुण झाले असून त्यांनी अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. फॉरवर्ड्सच्या अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर, तिसर्या क्वार्टरमध्ये ३३ व्या मिनिटाला सलीमा टेटेने गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. मात्र, भारताची आघाडी फार काळ टिकली नाही.**





सामना १–१ बरोबरीत

# तगड्या बेल्जियमला इजिप्तने सहज झुंजवले

वॉशिंग्टन : इजिप्तची पहिल्या विश्वचषक विजयासाठीची ९२ वर्षांची प्रतीक्षा आणखी वाढली आहे. मंगळवारी त्यांनी ९ व्या क्रमांकावरील बेल्जियमवर १–० आघाडी घेतली. पण बेल्जियमचा स्टार स्ट्रायकर, रोमेलू लुकाकूने मैदानात प्रवेश केला आणि त्याने इजिप्तचा आनंद फार काळ साजरा करू दिला नाही. रोमेलून ६६ व्या मिनिटाला गोल करत १–१ अशी बरोबरी केली. १९व्या मिनिटाला, इजिप्तचा मिडफिल्डर इमाम अशूरने बेल्जियमच्या बचावातील चुकीचा फायदा उचलत गोल केला. अशूरच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हा पहिला गोल होता. त्यानंतर बेल्जियमने बरोबरी साधण्याचा प्रयत्न सुरूच ठेवले, पण ते अयशस्वी ठरले. ६६ व्या मिनिटाला प्रशिक्षकाने स्टार स्ट्रायकर रोमेलू लुकाकूला मैदानात उतरवले.

# बॉक्सरच्या मुलाने मॅच जिंकवली, अफगाणिस्तानचा काटा काढला

## टीम इंडियाची फायनलमध्ये धडक

नवी दिल्ली–श्रीलंकेत सूरू असलेल्या ट्राय सिरीजमध्ये टीम इंडियाने आज अफगाणिस्तानच्या अ संघाचा १०१ धावांनी पराभव केला आहे. खरं तर टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना ३१९ धावा ठोकल्या होत्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तान २१८ धावांवर ऑलआऊट झाली होती. त्यामुळे टीम इंडियाने हा सामना १०१ धावांनी जिंकला. या विजयानंतर टीम इंडिया जवळ जवळ फायनलमध्ये पोहाचली आहे.टीम इंडियाच्या या विजयाचा शिल्पकार बॉक्सरचा मुलगा ठरला आहे. दरम्यान हा खेळाडू नेमका कोण आहे? हे जाणून घेऊयात.
टीम इंडियाने दिलेल्या ३१९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानची सूरूवात चांगली झाली नव्हती.कारण हसन एसाखिल हा ओपनर १४ धावांवर बाद झाला होता.त्याच्या पाठोपाठ खालिद तानिवल १४ वर बाद झाला. त्याच्यानंतर चांगला लयीत खेळत असलेला कॅप्टन इम्रान मीर ३२ वर बाद झाला होता.





त्यानंतर फैसल शिनोजादा आणि बाहिर शाह मैदानात होते. फैसलने ४६ आणि बाहिर शाहने ५७ धावांची खेळी करून अफगाणिस्तानला हा सामना जिंकवून देण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांची विकेट पडताच संपूर्ण मॅच फिरली. त्यानंतर मोहम्मद ईशाक १६,फरमनुल्लाह साफी १७, अब्दुल्लाह अहमदझाने ६ धावांवर बाद झाला. रहमान ८ आणि जाहीर खान ४ वर आऊच झाला.अशाप्रकारे बांग्लादेश २१८ धावांवर ऑल आऊट झाली आणि टीम इंडियाने हा सामना १०१ धावांनी जिंकला होता.
टीम इंडियाच्या विजयाचा शिल्पकार हा बॉक्सरचा मुलगा असलेला २२ वर्षीय निशांत सिंद्धु ठरला आहे. कारण त्याने अफगाणिस्तानविरूद्ध ४ विकेट घेतल्या होत्या.त्याचसोबत नाबाद २१ धावांची खेळी करून त्याने बॅटीने योगदान दिले होते. त्यामुळे टीम इंडिया हा सामना जिंकू शकली होती.

**कोण आहे बॉक्सरचा मुलगा?**

बॉक्सरचा मुलगा हा २२ वर्षीय निशांत सिंद्धु आहे. निशांत सिंद्धुचे वडील राज्यस्तरावर बॉक्सर होते. निशांत सिंद्धुलाही आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकायचे होते, परंतु हरियाणामधील माजी 'फर्स्ट–क्लास' क्रिकेटपटू अश्वनी कुमार यांच्या अकादमीत सामील झाल्यानंतर त्याला क्रिकेटची आवड निर्माण झाली.२०१८–१९ च्या 'अंडर–१६ विजय मर्चंट ट्रॉफी'मध्ये ५७२ धावा आणि २३ विकेट्स घेतल्याने निशांत प्रसिद्धीझोतात आला होता.त्याच्या या कामगिरीमुळे अंतिम सामन्यात हरियाणाने झारखंडवर विजय मिळवला होता.
दरम्यान वेस्ट इंडीजमध्ये झालेल्या २०२२ च्या 'अंडर–१९ वर्ल्डकपमध्ये सिंधूने ५ सामन्यांत ६ विकेटस घेतले आणि तो आपल्या संघातील प्रमुख खेळाडूंपैकी एक ठरला. २०२३च्या आयपीएल हंगामापूर्वी, सीएसके (णएख) संघाने त्याला ६० लाख रुपयांना आपल्या ताफ्यात सामील करून घेतले.
दरम्यान या विजयानंतर टीम इंडियाचे ४ सामन्यात ४ गुण झाले आहेत, आणि नेट रनरेट हा +०.४९४ इतका आहे. आता या गुणांसह टीम इंडिया जवळपास फायनलला पोहोचली आहे.

## सीईटी (पीसीएम) परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे उज्ज्वल यश



**लातूर/प्रतिनिधी:** एमएचटी-सीईटी (पीसीएम) परीक्षेच्या पहिल्या सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातील ३१ विद्यार्थी या परीक्षेत यश संपादन केले आहे.

सोनाली शरद पंचगल्ले ही विद्यार्थिनी ९९.६४ पर्सेंटाईल गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, व्यंकटेश विजयकुमार लड्डा ९६.९२ पर्सेंटाईल द्वितीय तर सार्थक चंद्रकांत वाडकर हा ९६.५५ पर्सेंटाईल गुण मिळवत महाविद्यालयात तृतीय आला आहे. तसेच श्रेया गजानन क्षीरसागर ९३.०४ पर्सेंटाईल, विवेक मुकुंद भोसले ९१.०२, कृष्णा विजयकुमार किसवे ९०, सृष्टी बाहेती ८७, श्रुती खटके ८३.२६, अखिलेश काळे ८३.००, तन्वी आलापूरे ८१.२२, पूजा किसवे ८०.१०, अदिती पांढरे ८०.००, ओमकार मोहिते ७३.११, अस्मीत फुलारी ७३.००, वैष्णवी मोरे ७२.००, प्राप्ती वरवटे ७०.००, करण खुपसे ६७.००, संजय सारडा ६६.००, यशश्री कद्दू ६५.००, आरुष वायकर ६४.००, प्रणव वाघमारे ६१.००, पृथ्वीराज चव्हाण ५९.००, सिध्दी रुद्रवार ५९.००, केशव गवाले ५०.००, प्रणव निंबुरगे ४५.००, गायत्री तांदळे ४०.००, मीनाक्षी काळे ३८.००, सृष्टी सूर्यवंशी ३८.००, अथर्व जाधव ३८.००, मानसी काळे ३७.००, तर आदित्य चव्हाण याने ३५.०० पर्सेंटाईलगुण मिळवले आहेत.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दीपक चवने, शिक्षण सहसंचालक संजय पंचगल्ले, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. एस. खोत, प्रा. वैशाली पाटील, प्रा. डी. ए. फंड, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

## आपत्कालीन परिस्थितीत कीर्ती ऑइल मिलची मनपास मदत

**लातूर/प्रतिनिधी :** आगीसारख्या भीषण दुर्घटना घडल्यानंतर निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत कीर्ती ऑइल मिलने लातूर महानगरपालिकेस वारंवार मदत केली आहे. काही दिवसांपूर्वी एमआयडीसी परिसरात आग लागली असतानाही कीर्ती ऑइल मिलने महानगरपालिकेस पाणीपुरवठा करून केली.

एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत काही दिवसांपूर्वी आग लागली होती. त्याची माहिती पालिकेला मिळाल्यानंतर अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी वाहनांसह तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. प्रत्यक्ष पाहणी केली असता आग भीषण स्वरूपाची असल्याचे लक्षात आले. आगीचे रौद्र रूप पाहून अन्य अग्निशमन वाहनांनाही पाचारण करण्यात आले.

आग विझविण्यासाठी कंपनीच्या चारही बाजूंनी पाण्याचा मारा करणे गरजेचे होते. परंतु पाण्याची क्षमता कमी असल्याचे लक्षात आल्यानंतर याच परिसरात असणाऱ्या कीर्ती ऑइल मिलशी संपर्क करण्यात आला. आग विझविण्यासाठी कीर्ती ऑइल मिलने सलग दोन दिवस पाण्याची मदत केली.

यापूर्वीही एमआयडीसी परिसरात आग लागण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यावेळी देखील कीर्ती ऑइल मिलने आग विझवण्यासाठी पाणीपुरवठा केलेला आहे. दुर्घटनांच्या समयी कीर्ती ऑइल मिल कडून मनपा प्रशासनास वारंवार मदत करण्यात आली आहे. यामुळेच एमआयडीसी परिसरात लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविणे पालिकेला सोयीचे ठरत आले आहे.

## MHT-CET 2026 मध्ये श्री त्रिपुरा-रिलायन्स लातूर पॅटर्नची घवघवीत कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी :** श्री संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचालित श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय व रिलायन्स लातूर पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी चक्ढ-उएढ २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेची गुणवत्तापूर्ण परंपरा कायम राखली आहे.

जाहीर झालेल्या निकालानुसार झउइ गटातील भावार्थ तराळे यांनी ९९.८५ परसेंटाईल मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. आदित्य गुजर (९९.८३) द्वितीय, तर मानसी कोहाळे (९९.७१) तृतीय ठरली.

संस्थेच्या एकूण निकालात ९० टक्क्यांपेक्षा अधिक परसेंटाईल मिळवणारे ६३ विद्यार्थी, ९५ टक्क्यांपेक्षा अधिक परसेंटाईल मिळवणारे २७ विद्यार्थी, तर ९९ टक्क्यांपेक्षा अधिक परसेंटाईल मिळवणारे ५ विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष उमाकांत होनराव, सचिव व प्राचार्या सुलक्षणा केवळराम आणि कार्यकारी संचालक प्रा. ओंकार होनराव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामागे संस्थेच्या अनुभवी प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे त्यांनी सांगितले.

# मराठवाड्यात पावसाची संमिश्र स्थिती

- धाराशिवमध्ये सर्वाधिक ११२ टक्के पाऊस
- छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यात पावसाची ओढ
- पेरणीयोग्य पावसाशिवाय पेरणीची घाई न करण्याचा विद्यापीठाचा सल्ला

**धाराशिव-लातूर/प्रतिनिधी:** यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मराठवाडा विभागात अतिशय संमिश्र चित्र पाहायला मिळत आहे. संपूर्ण छत्रपती संभाजीनगर विभागात जून महिन्यासाठी सरासरी ७१.५ मिमी पाऊस अपेक्षित असतो, मात्र प्रत्यक्षात केवळ ४०.७ मिमी (५६.९ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण पावसाळी हंगामाच्या (जून ते सप्टेंबर) ६७९.५ मिमी सरासरीचा विचार करता, आतापर्यंत केवळ सहा टक्के पाऊस पडला आहे. धाराशिव जिल्ह्याला पावसाचा सर्वाधिक दिलासा मिळाला आहे. धाराशिवमध्ये सरासरी ६७.७ मिमी पैकी ७६.३ मिमी (११२.७ टक्के) पाऊस बरसला आहे. बीड जिल्ह्यातही पावसाने चांगली हजेरी लावली. तिथे ६८.५ मिमी सरासरीच्या तुलनेत ५३.४ मिमी (७८ टक्के) पावसाची नोंद झाली. उर्वरित जिल्ह्यांमध्ये मात्र पाऊस मध्यम स्वरूपाचा आहे. लातूर जिल्ह्यात ४४.९ मिमी (६२.२ टक्के), नांदेडमध्ये ४९.० मिमी (५९.१ टक्के), हिंगोलीत ४३.८ मिमी (४८.६ टक्के) आणि परभणीत ३६.३ मिमी (४६.८ टक्के) पाऊस झाला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांत पावसाने मोठी दडी मारली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वात कमी म्हणजे अवघा १३.२ मिमी (१९.८ टक्के) आणि जालना जिल्ह्यात १९.२ मिमी (२७.२ टक्के) पाऊस झाला आहे.

**हवामान अंदाज आणि इशारा**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईच्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता आहे. १६ आणि १७ जून रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि नांदेड जिल्ह्यात सायंकाळी वादळी वाऱ्यासह हलका पाऊस होऊ शकतो. १८ व १९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता असून, पुढील ३ ते ४ दिवसांत कमाल तापमान २ अंश सेल्सिअसने वाढेल. मात्र, विस्तारित अंदाजानुसार १९ ते २५ जून दरम्यान मराठवाड्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे.

**कृषी विद्यापीठाचा सल्ला**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीच्या तज्ज्ञ समितीने सध्याचा पाऊस हा पूर्व-मौसमी असल्याने शेतकऱ्यांना ७५ ते १०० मिमी पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई न करण्याचा सल्ला दिला आहे. कपाशीसाठी कोरडवाहू वा बागायती प्रकारानुसार वाण निवडावेत. कापूस पिकात तूर, सोयाबीन किंवा मूग, उडीद आंतरपीक पद्धती वापरावी. मर व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास सुडोमोनास फ्लूयुरोसन्स (१० ग्रॅम) किंवा कार्बेंडेझीम (३ ग्रॅम) प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. तुरीसाठी रायझोबियम, स्फुरद विरघळविणारे जिवाणू आणि ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करावी. भुईमुगासाठी एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२ या वाणांचा वापर करून थायरमची बीजप्रक्रिया करावी. मक्याची अमेरिकन लष्करी अळीपासून संरक्षणासाठी सायन्ट्रानिलीप्रोल + थायामिथॉक्झाम (६ मिली प्रति किलो) बीजप्रक्रिया आवर्जून करून पीक व्यवस्थापन करावे. तर केळी बागेत घड वाढीसाठी ००:५२:३४ (१५ ग्रॅम प्रति लिटर) फवारणी करावी. आंबा बागेत ढगाळ वातावरणामुळे पर्णगूच्छ रोग टाळण्यासाठी रोगनाशकाची फवारणी करावी. नवीन फळबाग लागवडीसाठी (केळी, आंबा, सीताफळ) रोपे केवळ शासकीय नोंदणीकृत रोपटिकेतूनच खरेदी करावीत. वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेऊन लहान वेलवर्गीय झाडांना काठीने आधार देऊन फळबाग, भाजीपालांचे व्यवस्थापन करावे. तसेच पशुधन व्यवस्थापन करताना अचानक झालेल्या वातावरणीय बदलामुळे जनावरांचा गोठा कोरडा व हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. दुभत्या जनावरांची कास पोटॅशियम परमॅग्नेटच्या पाण्याने धुवावी. पावसाळ्यात जनावरे उघड्यावर किंवा झाडाखाली बांधू नयेत, तसेच कोवळा व हिरवा चारा जास्त प्रमाणात देणे टाळावे, असाही कृषी विद्यापीठाने सल्ला दिला आहे.

# बुलेट ट्रेनने मुंबई-पुणे ४८ मिनिटांत; महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे केंद्र बनवणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जबिलच्या रांजणगाव येथील अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाचे उद्घाटन; इलेक्ट्रॉनिक्स, डेटा सेंटर आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर

**पुणे/प्रतिनिधी:** मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे दोन्ही शहरांतील प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत होणार असून मुंबई आणि पुणे हे एकात्मिक आर्थिक क्षेत्र म्हणून विकसित होतील. तसेच जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडून महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील जबिल कंपनीच्या अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, आमदार दिलीप वळसे पाटील, ज्ञानेश्वर कटके, राज्याचे उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, जॅबिलचे कार्यकारी उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अँडी प्रिस्टली, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र देशातील डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून भारतातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता राज्यात विकसित होत आहे. त्यामुळे डेटा सेंटर, डीप टेक, इलेक्ट्रॉनिक्स आणि चिप उत्पादनाशी संबंधित संपूर्ण उद्योग परिसंस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीमध्ये महाराष्ट्राने अग्रस्थान मिळविल्याचे नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्र सरकारने राज्याला दिलेल्या इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरमुळे उद्योग क्षेत्राला नवी गती मिळणार आहे.

यावेळी त्यांनी जेएनपीटी आणि उभारणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या वाढवण बंदराला समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमोर मांडल्याची माहिती दिली. हा कॉरिडॉर जालना, वर्धा येथील ड्राय पोर्ट आणि पुढे गडचिरोलीपर्यंत जोडला जाणार असून त्यामुळे लॉजिस्टिक्सचा खर्च ७ ते ८ टक्क्यांपर्यंत कमी होईल. यामुळे महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील प्रभावी केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राचा सुमारे १४ टक्के वाटा असून निर्यातीत हा वाटा २० टक्क्यांपर्यंत असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.



जबिलच्या या अत्याधुनिक प्रकल्पात दिसणारी अचूकता, प्रगत तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील नवकल्पना भारतातील उत्पादन क्षेत्राच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतीक आहेत. भारत आज इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि निर्यातीमध्ये मोठी झेप घेत असून मोबाईल उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर झाल्यानंतर आता सेमीकंडक्टर आणि चिप निर्मिती क्षेत्रातही देशाने भक्कम पाऊल टाकले आहे, असेही श्री.फडणवीस यांनी नमूद केले.

राज्यातील उद्योगांना शासन भागीदार म्हणून पाहत असून व्यवसाय सुलभतेसाठी आवश्यक असलेले सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. रांजणगाव परिसरात महावितरण (एमएसईडीसीएल) चे स्वतंत्र विभागीय कार्यालय स्थापन करण्यबाबत सकारात्मक निर्णय घेणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेली कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत या औद्योगिक पट्ट्यात पोलिस यंत्रणा अधिक बळकट करण्यात येईल आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जबिलच्या पुणे येथील अत्याधुनिक प्रकल्पाचे कौतुक करत भारताला जागतिक इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील विश्वासार्ह भागीदार बनविण्याचा निर्धार व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या जमीन सुधारणांमुळे आणि महाराष्ट्र शासनाच्या जलद निर्णय प्रक्रियेमुळे उद्योगांना मोठी चालना मिळाल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन उद्योग १३ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून इलेक्ट्रॉनिक्स ही भारताची तिसरी सर्वात मोठी निर्यात श्रेणी बनल्याचे त्यांनी नमूद केले.

भारताला इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत जगातील अग्रगण्य राष्ट्र बनविण्यासाठी गुणवत्ता, कौशल्य विकास आणि उच्च-अचूकता उत्पादनावर भर देण्याचे आवाहन करताना त्यांनी देशात चार सेमीकंडक्टर प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर रेल्वे प्रकल्प सुरू असून मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे हा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत, तर पुणे-हैदराबाद प्रवास सुमारे २ तास ८ मिनिटांत पूर्ण होईल, असे सांगून देशात मोठे औद्योगिक आणि पायाभूत परिवर्तन घडत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या एका वर्षात जबिल कंपनीचे भारतातील एकूण उत्पादन क्षेत्रफळ ५ लाख चौरस फुटांवरून १२ लाख चौरस फुटांपर्यंत वाढले आहे. तसेच कर्मचाऱ्यांची संख्या ५ हजारांवरून जवळपास ११ हजारांपर्यंत पोहोचली आहे असे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला म्हणाले.

जबिलचे कार्यकारी उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अँडी प्रिस्टली यांनीही यावेळी विचार व्यक्त केले. हा नवीन प्रकल्प कुशल मनुष्यबळ आणि अभियांत्रिकी क्षमता एकत्र आणून उच्च दर्जाची उत्पादने अधिक वेगाने तयार करण्यास मदत करेल, असे त्यांनी सांगितले.

## सोलापूर रेल्वे विभागाच्या पहिल्या पेन्शन अदालतमध्ये ८६ तक्रारींचे जागेवर निराकरण

**सोलापूर/प्रतिनिधी:** रेल्वे मंत्रालयाच्या सुशासन आणि नागरिकाभिमुख प्रशासनाच्या धोरणानुसार मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात १५ जून २०२६ रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात वर्ष २०२६ मधील पहिली पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली. निवृत्त रेल्वे कर्मचारी आणि कौटुंबिक पेन्शनधारकांच्या विविध तक्रारींचे तत्काळ आणि प्रभावी निराकरण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पेन्शनसंदर्भातील समस्या पारदर्शक, प्रतिसादक्षम आणि वेळबद्ध पद्धतीने सोडविण्यासाठी पेन्शन अदालत हे महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असून, निवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी रेल्वे प्रशासनाची बांधिलकी यामुळे अधोरेखित होते. या कार्यक्रमात विविध पेन्शनधारक संघटनांचे प्रतिनिधी, निवृत्त रेल्वे कर्मचारी तसेच कौटुंबिक पेन्शनधारकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अदालतीदरम्यान पेन्शनधारकांना त्यांच्या तक्रारी संबंधित विभागांपुढे थेट मांडण्याची संधी देण्यात आली. कार्मिक (Personnel) आणि लेखा (Accounts) विभागातील अधिकाऱ्यांनी प्रत्येक प्रकरणाची सखोल छाननी करून शासनाच्या विद्यमान नियमांनुसार त्वरित कार्यवाही केली.

या पेन्शन अदालतमध्ये निवृत्त कर्मचारी आणि कौटुंबिक पेन्शनधारकांकडून प्राप्त झालेल्या एकूण ८६ तक्रारींवर सुनावणी करण्यात आली. विशेष म्हणजे सर्व ८६ तक्रारींचे जागेवरच समाधानकारक निराकरण करण्यात आले, ही बाब सोलापूर विभागाच्या कार्यक्षम आणि उत्तरदायी प्रशासनाची साक्ष देणारी ठरली.

तक्रार निवारण प्रक्रियेअंतर्गत पात्र निवृत्त कर्मचारी आणि कौटुंबिक पेन्शनधारकांना ६ हजार ८८५ रुपयांची रक्कम थेट बँक खात्यात (एनईएफटीद्वारे) जमा करण्यात आली, ज्यामुळे त्यांची प्रलंबित देयके वेळेत निकाली काढण्यात आली.

या यशस्वी पेन्शन अदालतीमुळे सोलापूर रेल्वे विभागाची पेन्शनधारकांच्या कल्याणासाठीची वचनबद्धता, प्रशासनातील पारदर्शकता आणि निवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न पुन्हा अधोरेखित झाले आहेत. निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे लाभ आणि सेवा कोणत्याही अडचणीशिवाय मिळाव्यात यासाठी विभाग कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) यांच्यासह वरिष्ठ रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तक्रार निवारण प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली. त्यामुळे निवृत्त रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी ही पेन्शन अदालत अत्यंत उपयुक्त ठरल्याचे सांगण्यात आले.

## वलांडी येथील निवासी मतिमंद विद्यालयात विद्यार्थी- पालकांचे अनोखे स्वागत



**लातूर/प्रतिनिधी:** शाळेचा पहिलाच दिवस १५ जून असल्याने या दिवशी श्री संगमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ शिऊरद्वारा संचालित वलांडी ता. देवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज निवासी मतिमंद विद्यालय आणि बजरंग निवासी अपंग विद्यालय या विद्यालयामध्ये अनोख्या पद्धतीने विद्यार्थी- पालकांचे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे अधिकमासचा शेवटचा दिवस असल्याने सर्वांना धोंडे जेवण देण्यात आले.

तत्पूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रथम दिवसी विद्यालयामध्ये विद्यार्थी - पालक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्याबरोबर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश वाटप पालकांच्या हस्ते करण्यात आले. तसेच अधिकमहिण्याच्या औचित्य साधुन पालकांना व विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने धोंडे जेवण देण्यात आले. तसेच येणाऱ्या माता भगिनींना साडीचोळी देऊन त्यांची ओटी भरण्यात आली. मोठ्या उत्साहात जंगी कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षण संस्थेचे संस्थापक शिवराज अष्टुरे, संस्थेच्या अध्यक्ष सौ. सरोजा अष्टुरे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थी पालकांना शुभेच्छा दिल्या.

संतोषकुमार नाईकवाडी यांच्या सहायक आयुक्त सक्षमीकरण विभाग जिल्हा परिषद लातूर यांच्या सांगण्यावरून गायकवाड राजु (वै.सा. का.) व वाकडे बाळासाहेब (स. सल्लागार) उपस्थितीराहून कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रसाठी दोन्ही विद्यालयातील मुख्याध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# पोदार प्रेप धाराशिव शाळेला राष्ट्रीय पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील पोदार प्रेप या नामांकित शिक्षण संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर महत्त्वपूर्ण राष्ट्रीय पुरस्कारांवर नाव कोरले आहे. संस्थेला एक्सेलन्स इन मिडिया आऊटरीच अवॉर्ड २०२५-२६ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या यशोगाथा आणि गुणवत्तापूर्ण बालशिक्षणातील विशेष योगदानाची दखल घेऊन संस्थेला हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. या यशामुळे धाराशिव परिसरासह संपूर्ण शिक्षण क्षेत्रात पोदार प्रेपचे मोठे कौतुक होत आहे. माध्यमांद्वारे विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी प्रसिद्धी केल्याबद्दल पोदार प्रेपने देशात प्रथम क्रमांक मिळवला, ज्यासाठी त्यांना हा मानाचा मिडिया आऊटरीच पुरस्कार प्राप्त झाला. या यशामागे मुख्याध्यापिका रेशमा संकपाल मॅडम आणि प्राचार्य वाल्मिक सोमासे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच प्रशासकीय अधिकारी जीवन कुलकर्णी सर यांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या मैदानात आयोजित विशेष प्रार्थना सभेत प्राचार्य वाल्मिक सोमासे सर यांच्या हस्ते पोदार प्रेप धाराशिवच्या संपूर्ण टीमला ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी टीमचे अभिनंदन केले. हा सन्मान संपूर्ण पोदार प्रेप परिवारासाठी अभिमानास्पद असून भविष्यातही अशाच उत्कृष्ट कार्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# हाफकिन संस्था आणि 'चक्र' यांच्यात सामंजस्य करार

मुंबई, (प्रतिनिधी)- हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था आणि महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधे विभागांतर्गत कार्यरत सेंटर फॉर हेल्थ, अप्लाइड नॉलेज अँड रिसर्च ऑटोनॉमी (चक्र) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

१८९९ मध्ये स्थापन झालेली हाफकिन संस्था ही देशातील सर्वात जुन्या जैववैद्यकीय संशोधन संस्थांपैकी एक असून संसर्गजन्य रोगांवरील संशोधन, प्रशिक्षण आणि चाचणी क्षेत्रात अग्रणी भूमिका बजावत आहे.

या सामंजस्य कराराअंतर्गत प्राध्यापक विकास, क्लिनिकल ट्रायल्स, जैववैद्यकीय संशोधन, ट्रान्सलेशनल मेडिसिन, जीनोमिक्स, सार्वजनिक आरोग्य तसेच क्षमता विकास या क्षेत्रांमध्ये दोन्ही संस्था संयुक्तपणे कार्य करणार आहेत. याशिवाय संयुक्त संशोधन प्रकल्प, प्रशिक्षण कार्यक्रम, प्राध्यापकांची देवाण-घेवाण आणि संशोधनासाठी उपलब्ध पायाभूत सुविधांचा परस्पर वापर यांनाही प्रोत्साहन दिले जाणार आहे.

या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण, संशोधन, क्लिनिकल ट्रायल्स आणि आरोग्यसेवा क्षेत्रात उत्कृष्टतेला चालना मिळण्यास मदत होणार असून नव्या संशोधनास संधी आणि ज्ञानवृद्धीसाठीही महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या कराराच्या वेळी वैद्यकीय शिक्षण व औषधे विभागाचे सचिव धीरज कुमार, चक्रच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रंजना कुमार, मुख्य प्रशासकीय अधिकारी ब्रिगेडियर मुलगुंद, हाफकिन संस्थेच्या संचालक डॉ. सुवर्णा खरात, मुख्य प्रशासकीय अधिकारी अजित जगताप, सहाय्यक संचालक डॉ. उषा पद्मनाभन, वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी डॉ. वृषाली पाटील तसेच प्रशिक्षण विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# संपामुळे आरटीओ कार्यालयात शुकशुकाट, वाहन नोंदणी:परवान्याची २५० कामे ठप्प



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव आरटीओ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या संपामुळे मंगळवारी धाराशिवमधील आरटीओच्या कार्यालयात शुकशुकाट होता. ग्रामीण भागातून विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना संपामुळे आल्यापावली माघारी फिरावे लागले. दिवसभरात वाहन नोंदणी, हस्तांतरण, चालक परवान्याची सुमारे २५० हून अधिक कामे खोळंबली. त्यामुळे आलेल्या नागरिकांनी संताप व्यक्त केला. तर कर्मचाऱ्यांनी मागण्यांसाठी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.

मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या माहितीनुसार आरटीओ विभागाचा नवीन आकृतिबंध मंजूर होऊन सुमारे साडेतीन वर्षे होऊनही अद्याप सेवाप्रवेश नियमांची अंमलबजावणी झाली नाही. यामुळे राज्यात अनेक कर्मचाऱ्यांची पदोन्नती रखडली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक व सेवाविषयक नुकसान होत असल्याने प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील आरटीओ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मंगळवारी दि. १६ जूनपासून बेमुदत संप पुकारला आहे. त्यामुळे आरटीओ विभागातील वाहन परवाना, नोंदणीसह अनेक कामे ठप्प झाली आहेत.

मंगळवारी धाराशिव उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर कर्मचारी संघटनेचे धनंजय लोंढे यांच्यासह अन्य सदस्यांनी एकत्र येत घोषणाबाजी केली. तसेच यानंतर धाराशिवचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. त्यामुळे आरटीओ कार्यालय परिसरात मंगळवारी शुकशुकाट दिसत होता. या संपामुळे वाहन चालवण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), वाहन नोंदणी, वाहन तपासणी, नोंदणी प्रमाणपत्र वितरण, वाहनावर बोजा चढवणे उतरवणे, वाहन हस्तांतरण प्रस्ताव, महसूल नोंदणी, कार्यालयातील यूजर आयडीसह अन्य कार्यालयीन कामावर मोठा परिणाम झाला. कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी वेळोवळी संघटनेमार्फत पाठपुरावा करुन प्रशासनाला पुरेसा वेळ दिला होता. मात्र आश्वासनाविना काहीच हाती पडले नाही. त्यामुळेच राज्यव्यापी बेमुदत आंदोलन सुरु असून आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम आहोत, संघटनेला लेखी आश्वासन दिल्यावरच आंदोलनातून माघार घेऊ. उमेश सांगळे, राज्य उपाध्यक्ष, मोटार वाहन विभाग संघटना आरटीओ विभागाच्या आकृतिबंधानंतर सेवानियमासाठी स्वत: परिवहनमंत्री प्रताप सरनाईक सकारात्मक आहेत. मात्र मंत्रालय स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांचाच खोडा असल्याने सेवा नियमचे काम रखडले आहे. यामुळे राज्यात अनेक वरिष्ठ लिपिकांना प्रमोशन मिळाल्यानंतर अवघ्या तीनच महिन्यातच पदावरून हटवून आयुक्त स्तरावरील एका पत्राने पुन्हा मूळ पदावर नेमणूक झाली. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच शिवाय सामाजिक प्रतिष्ठाही कमी झाल्याने कार्यालयात काम करणे कठीण झाल्याचे आरटीओ कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. आरटीओ विभागाचा आकृतिबंध मंजूर होऊन तीन वर्षापेक्षा जास्त काळ लोटूनही सेवानियम तयार न झाल्याने मला दिलेली पदोन्नती रद्द करण्यात आली आहे. माझी सेवा अजून केवळ दोन वर्ष राहिली असून, पात्र असूनही वेळेत पदोन्नतीचा लाभ न मिळाल्याने माझ्यासारख्या राज्यातील अनेक कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण, आर्थिक व सामाजिक नुकसान होत असल्याचे सांगण्यात येते.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

# शेतकऱ्यांनी गटशेतीचा अवलंब करावा: सारोळामध्ये ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना बांधावर जाऊन पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन



धाराशिव (प्रतिनिधी)- पारा येथे एल निनोचा संभाव्य धोका लक्षात घेता ग्राम स्तरावर सूक्ष्म नियोजन करून शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्यात येत आहे. एल निनोमुळे नक्कीच यावर्षी पावसाची अनियमित्ता दिसून येत आहे. याचप्रमाणे आपल्याला दरवर्षी कुठल्या ना कुठल्या नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागत आहे. तरी शेतकरी बांधवांनी याची चिंता न करता खंबीरपणे गट शेतीच्या माध्यमातून गावातील शेतकरी बांधवांना एकमेकांना साथ द्यावी, असे सारोळा मांडवा, सेलू येथील ग्राम महसूल अधिकारी डी. व्ही. सिरसेवाड यांनी केले.

या वेळी सिरसेवाड यांनी बदलते हवामान, पाऊस पाणी पाहून पिकाचे नियोजन करावे. याबाबत मार्गदर्शन केले. शेतीला एकांदा जोडपूरक व्यवसाय धंदा करावा. जास्तीत जास्त रासायनिक खते न वापरता नैसर्गिक पद्धतीने शेती करावी. प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी एखाद्या बांधाबाबत वाद-विवाद न करता सामोपचाराने वाद मिटून एकत्र येऊन शेती करावी.

पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मृदा व जलसंधारणाची कामे हाती घ्यावी. तसेच मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून ती जोपासावी. येणाऱ्या काळात गावात गटातटाचे राजकारण न करता गावाच्या विकासासाठी काम करावे. शासनाच्या विविध योजनेचा फायदा घेऊन आपल्या कुटुंबाबरोबरच गावचा विकास साधावा.

# जून महिन्यातही १२८ गावात टंचाई; १२ ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा

धाराशिव गतवर्षी मान्सूनमध्ये सहा महिने पाऊस झाले. मात्र सिंचनासाठी पाण्याचा बेसुमार उपसा झाल्याने प्रकल्पांनी मे महिन्यातच तळ गाठले. परिणामी, जिल्ह्यातील १२८ गावांना टंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. या गावांसाठी २०८ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. यातील १२ गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. पाणी टंचाई तीव्र होऊ नये, यासाठी प्रशासनाने ४४ प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवले आहे. मागील वर्षी मे महिन्यातही जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळात धुवाँधार पाऊस झाले होते. काही भागात अतिवृष्टीही झाली होती. त्यामुळे उन्हाळ्यातच नद्या प्रवाहित झाल्या होत्या. त्यानंतर जून ते सप्टेंबर चार महिनेही पावसाचे राहिले. ऑक्टोबर महिन्यात परतीचे पाऊसही जोरदार झाले. सहा महिने पावसाचे राहिल्याने दोनशेहून अधिक प्रकल्पात ओव्हरफ्लो झाले होते. मार्च महिन्यापासून उन्हाच्या झळा तीव्र होऊ लागताच पाण्याचा वापरही वाढू लागला. शेतीपिकांना पाण्याचा उपसा वाढला. शिवाय, तापमान ४० अंशाच्या पुढे गेल्याने बाष्पीभवनही वाढले. त्यामुळे मे महिन्यातच प्रकल्पातही पाणी साठा झपाट्याने कमी झाला. त्यामुळे अनेक गावातील पाणीपुरवठ्यावरही परिणाम होऊ लागला आहे. ग्रामस्थांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने अधिग्रहण, टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जिल्ह्यातील तब्बल ११६ गावांना अधिग्रहित विहिरीद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५० | सत्यमेव जयते | पुण्यश्लोक ३००

**जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव** (उपचिटणीस शाखा)
मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-४/कावि-२५८०/ सिआर-५३ | दिनांक :- निम्नस्वाक्षरीत

**जाहिर प्रगटन**
**(विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)**

सर्व नागरिक मौजे. देवळाली ता. भूम जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, **देवळाली** ता. भूम जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर ४४२ मध्ये **रूपाली समाधान सातव** रा. देवळाली ता.भूम यांनी शोभेची दारू तयार(फटाका निर्मिती) करण्याची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू - जमीन मालक भारत दशरथ माळी**
**२. पश्चिम बाजू - गणेश शंकर तांबे**
**३. दक्षिण बाजू - हरीदास रामदास तांबे**
**४. उत्तर बाजू - बप्पासाहेब भागवत सातव**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशी, मा. पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, भूम/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य नांदेड्ढ यांचे मार्फत झालेली आहे.

तरी, **रूपाली समाधान सातव रा. देवळाली** ता. भूम यांना मौजे. देवळाली ता. भूम येथील जमीन गट नंबर ४४२ मध्ये शोभेची दारू तयार करण्याची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ ची परवानगी देणे बाबत कोणास **कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले** पासून **(०८)** दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Digitally Signed by
Vidyacharan Jagannath Kadavkar
Date:15-06-2026 16:10:41

**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

**जिमाका/एके/जाहि/३१**

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649